**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**सभा क्रमांक - ०९ सोमवार दिनांक २८/०३/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात होणा-या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ५६ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२ - २०२३ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) |
| ५७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २१/०३/२०२२.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०९ प्रस्ताव क्रमांक : ५६ दिनांक:- २८/०३/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२ -२०२३ चे मुळ अंदाजपत्रक ( मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह )

**--*--**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ महानगरपालिका, नगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज यामधील मा.स्थायी समितीचे कामकाज (३) (के) अन्वये मान्यता झाल्याचे कायद्यान्वये अधोरेखीत झाले आहे. त्यामुळे सन २०२१-२०२२ चे सुधारीत व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) चा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यांत यावा हि विनंती.

**<u>दिनांक ११/०३/२०२२ रोजी झालेल्या मा.स्थायी समितीच्या विषय क्रमांक २०६ चा ठराव :-</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे (**सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** ) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे (**सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** ) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

* रिव्हीजन करणे करीता सध्या ई - निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.ठेकेदार संस्थेकडून रिव्हीजन पुर्ण झाल्यावर म.न.पा.हद्दीमधील ज्या मालमत्ता धारकांना कर आकारणी झालेली नाही त्या सर्व मालमत्ता धारकांना कराची नव्याने आकारणी होणार असल्याने " **सर्वसाधारण कर** " या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये १ कोटी ६५ लक्ष रूपयांनी वाढ सचविण्यात येत आहे.

* शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील **"ना हरकत प्रमाणपत्र "** या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखांनी वाढ करण्यात यावी.,

* "**मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई** "या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

* प्रत्येक झोनसाठी अग्निशमन वाहन खरेदी करणे कामी "**अग्निशमन वाहन खरेदी** "'या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे येथील रक्तपेढी मध्ये रक्तदाता (डोनर) असल्यास ब्लड बॅग मोफत देण्यात यावी. तसेच रक्तदाता (डोनर)नसल्यास प्रति बॅग रू.१००/- फि आकारणी करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

* चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

* सावेडी गांवठाण येथील महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटर (एन.सी.सी.कार्या .) या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

* "**अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे** "या लेखाशिर्षा मध्ये मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या रू.२ कोटी ने वाढ सुचविण्यात येत आहे.

* "**नळधारकाकडून जमा पाणीपट्टी**" या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २ कोटीने वाढ करण्यात यावी.

* "**मालमत्ता नांव नोंदणी फि** "या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* **"जाहिरात बोर्ड जागा भाडे "** या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असल्याने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये ५० लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे चार प्रभाग समिती कार्यालय व बेल्हेगांव,नागापुर व केडगांव येथील उप कार्यालय या कार्यालयातील कामकाजावर नियंत्रण ठेवणे कामी सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविण्यात यावेत व येथील कामकाज पहाणे करीता मुख्यकार्यालयातील मा.महापौर ,मा.आयुक्तसाहेब यांच्या दालनामध्ये तसेच नागरीकांना पहाण्या करीता पॅसेज मध्ये एकुण तीन स्क्रीन बसविण्यात याव्यात या करीता **"नविन संगणक,संगणक साहित्य,हार्डवेअर,सॉपटवेअर खरेदी "** या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रूपये ४० लक्ष दर्शविण्यात यावी.

* म.न.पा.हद्दीमध्ये गॅस कंपनी मार्फत घरगुती गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याने तसेच केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते त्यामुळे **" रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर"** या लेखाशिर्षा मध्ये रूपये ३ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता **"अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम "**या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* **" विकास भार निधीतुन खर्च "** या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* **" बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा "** या लेखाशिर्षा मध्ये रू. १० लाख रूपयांनी वाढ करावी.

* **"रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) "** या लेखाशिर्षामध्ये रू.१ कोटीने सुचविण्यात येत आहे.

* हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबतची निविदा मा.स्थायी समिति मध्ये निविदा मंजूर झालेली असून या कामा करीता रक्कम रूपये १ कोटी ५० लाखांची वाढ **"पुतळे बसविणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.एकुण रक्कम रू.३ कोटी १० लक्ष दर्शविण्यात यावी.तसेच राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा.,महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा,छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा या कामा करीता येणारा खर्च **"पुतळे बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* लोकशाहीर आण्णभाउ साठे ,विर लहुजी वस्ताद तसेच केडगांव येथील महात्मा ज्योतीबा फुले , भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सिध्दीबाग येथील भगवान गौतमबुध्द या सर्व पुतळयांच्या देखभाल करणे करीता **"पुतळे देखभाल"** या नविन लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २५ लाखांची तरतुद करण्यात यावी.

* शहर व उपनगररामध्ये **"नविन इलेक्ट्रीक पोल बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत २५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

* अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. **"अनाधिकृत नळ निमानुकुल करणे "**या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटीची वाढ करण्यात यावी.

* **"पाणी विक्री जमा "**या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख ने वाढ करण्यात यावी.

* महानगरपालिकेची रक्तपेढी अदयावत करणे करीता ब्लड डोनर व्हॅन खरेदी करणे करीता रक्कम रूपये ४० लाखांची तरतुद करण्यात यावी.

* **"मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी"** या लेखाशिर्षा अंतर्गत झालेल्या कामाचे रक्कम रू.७ लाखापर्यतची देयके अर्थ विभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती तात्काळ अदा करण्यात यावी.

* **मा.महापौर शहर विकास निधी** रू.२ कोटी ५० लाख, **" मा.उपमहापौर शहर विकास निधी "** रू.१ कोटी ५०लाख, **" मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी "** रू.१ कोटीची तरतुद दर्शविण्यात यावी.

* " **मा.महापौर चषक या लेखाशिर्षा** "मध्ये रक्कम रूपये ५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* " **क्रीडांगणे विकसीत करणे** " या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये ५ लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग क्र.७मधील कब्रस्तान विकसीत करणे करीता मा.शासनाकडून प्राप्त **"अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र निधी "** या लेखाशिर्षा अंतर्गत रककम रूपये २० लाखांची कामे या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावीत.

* विकास योजना जी.आय.एस. (GIS Based) तयार करणे मा.शासनाच्या निर्देशानुसार काम होणे अत्यंत गरजेचे असल्याने या लेखाशिर्षा अंतरर्गत सन २०२१ -२२ करीता रक्कम रू. १ कोटी ने तरतुदी मध्ये वाढ करून , सन २०२१-२२ मधील भविष्य निर्वाह निधी तुट या लेखाशिर्षातील ५१ लाख ५० हजार व रस्ते,इमारतीवरील वीज बील या लेखाशिर्षातील ५० लाख तरतुद कमी करण्यात यावी.तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा करीता अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील महानगरपालिकेच्या सर्व जागांची व इतर शासकिय विभागांच्या मालकीच्या जागांचे ई.टी.एस./डी.जी.पी.एस.मशीन व्दारे कंटुर सह सर्व्हेक्षण करणे मिळकतीच्या हद्दीवर ३०.०० मीटर अंतराने कॉक्ट्रीट दगड बसवून डिमार्केशन करून हद्द कायम करून महानगरपालिकेच्या मालकी दर्शविणारे उपलब्ध दस्तावेज, ७/१२,जागेचे सर्व्हक्षण ,कंटुर नकाशे महानगरपालिकेस सादर करणे या कामी येणारा खर्च रक्कम रूपये २ कोटी ची वाढ करण्यात यावी.सदरचा खर्च अमृत योजना , १५ वा वित्त आयोग / विकास भार निधी किंवा वैशिष्टपुर्ण योजने अंतर्गत भागविण्यात यावा.

* प्रभाक क्र.६ मधील सावेडी गांवठाण मधील विठ्ठल मंदिर ते खांडरे घर ते सावेडी वेस पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे करीता रक्कम रूपये ४५ लाखांची तरतुद करण्यात यावी.सदर कामाकरीता "नविन रस्ते विकसीत करणे "या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च भागाविण्यात यावा.

* प्रभाग क्र.७ बोल्हेगांव मधील मारूतीराव घुले कॉलेज मुख्य रस्ता ते सुभाष कातोरे घर ते उमेश भोईटे यांच्या घरापर्यतचा रस्ता मजबुती करणासह कॉक्रीटीकरणक करणे या कामा करीता रू.२५ लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

* प्रभाग क्र.७ मधील गांधीनगर,बोल्हेगांव रोड ते खार ओढयापर्यत ९०० एम.एम.व्यासाची बंदपाईप गटर लाईन टाकणे या कामा करीता रू.१६ लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* **"वाढीव हद्दीतील पाईपलाईन टाकणे "**या लेखाशिर्षामध्ये रू.७० लाख वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत असलेले नागापुर - बोल्हेगांव उप कार्यालयाची इमारत पाडून नविन कार्यालयीन इमारत बोल्हेगांव गांवठाण येथे बांधणे या कामा करीता रू.१८ लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* प्रभाग क्र. १० मधिल मध्ये रामवाडी कोपरा ते जलालशहा कब्रस्तान ते एम.जे.पी.ऑफिस पर्यतचा रस्त्याचे साईड पट्टी व पेव्हींग ब्लॉक बसविणे करीता रू.२५लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.

* प्रभाग क्रमांक ०७बोल्हेगांव गावठांण अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे करीता रू.३०लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे"**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* प्रभाग क्रमांक ०७ मधील संत तुकाराम महाराज उद्यान व जॉगींग ट्रॅक विकसीत करणे करीता अंदाजीत रक्कम रूपये ३०लाख**"विकास भार निधी"**या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन भागविण्यात यावा.

* प्रभाग क्र.७ जिल्हापरिषद शाळा बोल्हेगांव गावठांण ते केशव कॉर्नर रस्ता मजबुतीसह डांबरीकरण करणे करीता रू.३० लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

* प्रभाग क्रमांक ११ मधिल कानडे मळा भागातील बोरा क्लीनीक ते गोवर्धन अपाटर्मेंट ते सर्व मंगल कार्यालय ते पुंड किराणा ते सुंबे घरापर्यत रस्ता मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे रू.२० लाखाचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

* प्रभाग क्रमांक १७ मधील कांबळे मळा येथील पोलीस चौकी पासून ते पोलीस पाटील यांचे घरा पर्यत रस्ता डांबरीकरण करणे व या रस्त्यावरील ओढयावरील पुलाची दूरूस्ती करणे या कामा करीता रक्कम रूपये ४५ लाख **"नविन रस्ते विकसीत करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च भागाविण्यात यावा.

* महानगरपालिकेच्या मालकीचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी सुसज्य ग्रंथालय उभारावे व स्मारकाची देखभाल दुरूस्ती सदरचा खर्च **"इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षा"** अंतर्गत करण्यात यावा. या कामा करीता रक्क्म रूपये २५ लाखांची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

* **"सामाजिक संस्थांना देणगी"** या लेखाशिर्षामध्ये रूपये ५ लाख तरतूद दर्शविण्यात यावी. रसिक ग्रुप,अ.नगर व नगर जल्लेष (ट्रस्ट) अ,नगर व इतर सामाजिक संस्थांना मागणी पत्रानुसार अनुक्रमे रूपये १लाख ५० हजार देणगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च **सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

* शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था,सामाजिक संस्था,यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल या करिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था,कंपनी,सामाजिक संस्था यांना या कामी प्रवृत्त करण्यात यावे व त्यांचे मार्फत सुशोभिकरणास परवानगी देण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०२२-२०२३ अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२०२३ सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे
अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
( मा.श्री.कुमार बबनराव वाकळे )
सभापती,स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०२१-२०२२ चे सुधारित व सन २०२२-२३ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर | | | | | |
| मा. सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) | | | | | |
| | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२१).......................................४५८.९६ | | | | | |
| एकुण जमा................................................................... ६८६६३.८० | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................. ६९१२२.७६ | | | | | |
| एकुण खर्च.................................................................. ६८७३९.७४ | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२२).................................. ३८३.०० | | | | | |
| अ. नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२१-२२** | मा.स्थायी समितीने शिफारसकेलेली तरतुद | सर्वसाधारण सभेने केलेला बदल | | मा.सर्वसाधारण सभेने मंजुर केलेली तरतूद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | विकास योजना GIS Based सुधारीत करणे (अमृत १५ वा वित्त आयोक/विकास भार किंवा वैशिष्टपुर्ण इ.योजना) | ६००.०० | १००.०० | | ७००.०० |
| २ | आकस्मिक खर्च (सा.प्र.वि.) | ३.०० | १.५० | | ४.५० |
| ३ | भविष्य निर्वाह निधी तूट | १००.०० | | ५१.५० | ४८.५० |
| ४ | रस्ते व इमारतीवरील विज बिल | ६४२.०० | | ५०.०० | ५९२.०० |
| | एकुण | ६०३.०० | १०१.५० | १०१.५० | ७०४.५० |

सही /-
सभापती, स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर

मा. स्थायी समितीने शिफारस केलेला सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)

सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२२)........................................ ३८३.०२

एकुण जमा.................................................................. ८१३७३.०६

सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................ ८१७५६.०८

एकुण खर्च.................................................................. ८१३९७.३१

अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२३)................................ ३५८.७७

| अ. नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२२-२३** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ५१२२.७० | १६५.०० | | ५२८७.७० |
| १ | ना हरकत प्रमाणपत्र (अग्निशमन) | ४.०० | २०.०० | | २४.०० |
| २ | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | १५०.०० | २००.०० | | ३५०.०० |
| ३ | मालमत्ता नांव नोदणी फी | ४२४.०० | ५०.०० | | ४७४.०० |
| ४ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | १०.०० | ५०.०० | | ६०.०० |
| ५ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईपासुन उत्पन्न | १०.०० | ५०.०० | | ६०.०० |
| ६ | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | ८००.०० | १००.०० | | ९००.०० |
| ७ | विकास भार निधी | ७००.०० | १५०.०० | | ८५०.०० |
| ८ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | ३.०० | १०.०० | | १३.०० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक) | ४०.०० | १००.०० | | १४०.०० |
| १० | अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे | २२०.०० | १००.०० | | ३२०.०० |
| ११ | पाणी विक्री जमा | २५.०० | ५०.०० | | ७५.०० |
| १२ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | २६४०.०० | २००.०० | | २८४०.०० |
| १३ | रस्ते फोडणे,जोडणे वसुली व बांधकाम इतर | ११००.०० | ३००.०० | | १४००.०० |
| | एकुण | ११२४८.७० | १५४५.०० | ०.०० | १२७९३.७० |

सही/-
सभापती,स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

| अ. नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२२-२३ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | नविन रस्ते विकसीत करणे | १५००.०० | ४५.०० | | १५४५.०० |
| २ | नविन वाहन खरेदी (अग्निशमन विभाग) | ८०.०० | ५०.०० | | १३०.०० |
| ३ | पुतळे बसविणे | १६०.०० | १५०.०० | | ३१०.०० |
| ४ | सामाजिक संस्थांना देणगी | ०.०० | ५.०० | | ५.०० |
| ५ | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | ८००.०० | १००.०० | | ९००.०० |
| ६ | विकास भार निधी | १७५.०० | ३७.५० | | २१२.५० |
| ७ | विकास भार निधी (नगररचना भू संपादन) | ५२५.०० | ११२.५० | | ६३७.५० |
| ८ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | ३.०० | १०.०० | | १३.०० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक) | ४०.०० | १००.०० | | १४०.०० |
| १० | विकास योजना GIS Based सुधारीत करणे (अमृत १५ वा वित्त आयोग /विकास भार किंवा वैशिष्टपुर्ण इ.योजना) | ५००.०० | २००.०० | | ७००.०० |
| ११ | वाढीव हद्दीत पाईपलाईन टाकणे | ३०.०० | ७०.०० | | १००.०० |
| १२ | पुतळे देखभाल | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| १३ | नविन इले.पोल व स्पॅन फिटींग | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| **१४** | ब्लड डोनर व्हॅन खरेदी | ०.०० | ४०.०० | | ४०.०० |
| **१५** | महापौर शहर विकास निधी | ०.०० | २५०.०० | | २५०.०० |
| **१६** | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | १५०.०० | | १५०.०० |
| **१७** | सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | १००.०० | | १००.०० |
| **१८** | महापौर चषक स्पर्धा | १५.०० | ५.०० | | २०.०० |
| **१९** | क्रीडांगणे विकसीत करणे | १.०० | ५.०० | | ६.०० |
| **२०** | नविन संकणक ,संगणक साहित्य,हार्डवेअर,सॉफ्टवेअर खरेदी(सर्व विभाग)/ई -गव्हर्नन्स | २५.०० | ४०.०० | | ६५.०० |
| **२१** | इमारत दुरूस्ती | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| | एकुण | ३९५४.०० | १५४५.०० | ०.०० | ५४९९.०० |

सही/-
सभापती,स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**चर्चा :- विषय क्रमांक ५६ चे वाचन**

**श्री.लोंढे :-** मा.सभापती, स्थायी समिती श्री.कुमार वाकळे, यांनी सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक मा.महापौर साहेब यांचेकडेस सादर करतील.

मा.सभापती, स्थायी समिती श्री.कुमार वाकळे, यांनी सन २०२२-२०२३ चे मुळ अंदाजपत्रक मा.महापौर साहेब यांचेकडेस सादर केले. यानंतर मा.सभापती स्थायी समिती यांनी अंदाजपत्रकाबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

**मा.श्री.कुमार वाकळे सभापती स्थायी समिती :-** यांनी मनोगताचे वाचन केले.

**मा.श्रीमती.मालन ढोणे :-** ८१७ कोटीचे अंदाजपत्रक तयार केले आहे.त्याला किती रुपयाची पिशवी जोडली आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** मा.सभापती यांनी पर्यावरण पुरक बॅग दिली आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** भारी बॅग दया.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मी प्रशासनाला प्रश्न विचारतो.आज शासनाचे निर्देशनानुसार ऑफ लाईन सभा घेत आहोत. प्रशासनाला मा महापौर यांचेपुढे राजदंड ठेवण्याचा विसर पडला आहे.

**नगरसचिव श्री.एस.बी.तडवी :-** अहमदनगर मनपातील चोपदाराचे पद भरले नाही. ते पद घेण्यास कोणी तयार होत नाही. पुर्वीच्या कर्मचा-यांचे दु:खद निधन झाले आहे. पुढच्या सभेपासुन एक कर्मचा-याची नेमणूक करु.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** अंदाजपत्रक २० फेब्रवारी च्या आत सादर करायला पाहिजे होते पण ते सादर झाले नाही. याची जबाबदारी कोणाची ते २० फेब्रवारीच्या आत का देत नाही. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते.

**मा.अति.आयुक्त श्री.पठारे :-** मागच्या वेळेस कर दर वाढीचे प्रस्ताव पाठवले. पण ते घेतले गेले नाही

**श्री.अनिल लोंढे :-** पाणी पुरवठा व अग्निशमन विभाग यांनी नगरसचिव विभाग यांचेकडे दरवाढीचे प्रस्ताव सादर केले.

**नगरसचिव श्री.एस.बी.तडवी :-** प्रशासनाकडुन प्रस्ताव तत्कालीन सभापती यांचेकडेस सादर केले होते. स्थायी समितीची मान्यता न घेता प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवले. परंतु महासभा न झाल्याने प्रस्ताव घेता आले नाही.

**श्री.अनिल लोंढे :-** कर दर वाढीचे प्रस्ताव आले होते. बजेट आले नव्हते.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** बजेट २० तारखेच्या आत आले नाही. उत्तर चुकीचे देऊ नका. अकौंट विभागाने उशीरा सादर केले.

**नगरसचिव श्री.एस.बी.तडवी :-** सर्व विभागाकडून माह्तिी उशीरा प्राप्त झाली.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** उशीर जरी झाला तरी आहे ते बजेट पाठवावे लागते.

**मा.अति.आयुक्त श्री.पठारे :-** पुढे जावुन आपल्यालाच कामकाजात अडचण येते.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** पुढच्या काळात जर उशीर झाला तर संबंधित विभाग प्रमुख यांना जबाबदार धरा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ज्यांच्यामुळे उशीर झाला त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. उदया सभा सुरु होण्यापुर्वी कोणत्या विभागाने माहिती वेळेत सादर केली नाही त्याबाबत माहिती देण्यांत यावी. उदया त्यांना बोलवा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** अभ्यासाला वेळ दया.

**मा.महापौर मॅडम :-** आजची सभा अभ्यासासाठी तहकुब करण्यात येत आहे. उदया सकाळी ११.०० वाजता सभा सुरु होईल. ( दिनांक २९/३/२०२२ )

दिनांक २८/०३/२०२२ रोजीची तहकुब सभा दिनांक २९/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु

**मा.श्री.गणेश कवडे :-** बल्लाळ साहेब, सोनटक्के साहेब यांना सर्वांनी दोन मिनीटे श्रंध्दाजली वहावी. पान नंबर :- २४ वाचन महसुली जमा

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** कालच्या सभेत बजेटला उशीर का झाला याबाबत माहिती दया.

**श्री.अनिल लोंढे :-** दिनांक ३०/१२/२०२१ पर्यंत खाते प्रमुखांची माहिती देण्याबाबत कळविले ३ ते ४ विभागाची माहिती आली नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** कोणत्या विभागाची माहिती आली नाही ते स्पष्ट सांगा.

**श्री.अनिल लोंढे :-** शेवटची माहिती दिनांक ०४/०३/२०२२ रोजी प्राप्त झाली. मला काल सभेमुळे वेळ मिळाला नाही. त्यामुळे काल विचारलेली माहिती देता आली नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** डिटेल माहिती दया. कोणत्या विभागाने माहिती दिली कोणी दिली नाही. बजेट कोलॲप्स झाले तर तुम्ही मुदत वाढवुन देणार का. कोणालाच काही गांभिर्य नाही.

**श्री.अनिल लोंढे :-** विद्युत, अतिक्रमण, नगररचना प्रमुख हे अंदाजपत्रकाच्या बैठकीला उपस्थित नव्हते व माहितीही दिली नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** जे अंदाजपत्रकीय बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. त्यांच्यावर आयुक्तांनी कारवाई करावी. संबंधीत विभागप्रमुखांना येथे समोर बोलवा.

**उपायुक्त श्री.डांगे :-** विद्युत विभागाचा चार्ज श्री.जोशी साहेबांकडे होता. ते कोव्हीडने आजारी असल्याने बजेटच्या बैठकीस उपस्थित नव्हते.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** चारठाणकर साहेब रजेवर कसे आहेत. सभा असतांना गैरहजर राहणे ही फॅशन झाली आहे. स्थायी समितीलाही अधिकारी अनुपस्थित राहतात.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** रजा रद्द करुन तात्काळ हजर व्हायला पाहिजे.

**मा.आयुक्त साहेब :-** सभेपुर्वी मंजूरी घेवून रजेवर आहेत.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** दुस-या विभागाने कधी दिली.

**श्री.अनिल लोंढे :-** दिनांक २६/०१/२०२२ पर्यंत माहिती दिली. सामान्य प्रसाशन विभाग, रेकॉर्ड विभाग, अग्निशमन विभाग, आस्थापना विभाग, यांनी दिनांक ३१/१२/२०२१ च्या आत माहिती दिली. १० ते १५ विभागांनी उशिरा माहिती दिली

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** उशिरा माहिती दिली मग त्यांच्यावर कारवाई करा. ज्यांनी उशिरा माहिती दिली त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करा तसा ठराव आज करा. आयुक्तांपूढे रिपोर्ट ठेवयला पाहिजे होता.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** नगरसेवकांना बजेट मिटींगसाठी फोन करायला पाहीजे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** संबंधीत ३ विभागाचा खुलासा घ्या. व भविष्यात परत अशी चुक झाली तर जागेवर निलंबित करा.

**मा.आयुक्त साहेब :-** शिस्तभंगाची कारवाई करु.

**मा.आयुक्त साहेब :-** बजेटच्या बाबतीत आपण बैठक घेतली होती. आपल्याला उदिष्ट कव्हर करायचे होते. महानगपालिकेकडे उपलब्ध असणारा अपुरा कर्मचारी वर्ग व आहे त्या कर्मचारी वर्गाकडून काम करुन घ्यावे लागते. काही विभाग प्रमुखांकडे अतिरिक्त पदांचा भार सोपविण्यांत आलेला आहे. तडवीकडे नगरसचिवांचे काम आहे. तसेच मुख्यलेखाधिकारी या पदाचाही पदभार सोपविण्यांत आलेला आहे. लोंढे कडून एकटयांकडून काम करुन घ्यावे लागते. विभाग प्रमुखांशी मी स्वत: बोललो त्यांचेकडे आकडेवारी तयार नव्हती. माहिती देण्यासाठी कोणी चार दिवस कोणी आठ दिवस मुदत घेतली. जेथे कर वाढ करणे शक्य होते ते करवाढीचे प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविले. स्थायी समितीत निर्णय झाला. दरम्यानच्या काळात महासभा झाली नाही. दुसरा विषय करवाढीच्या बाबतीत रीॲसेसमेंट करणे गरजेचे होते. या कामासाठी निविदा काढण्यांत आल्या परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. गेले सहा महिने त्यावर काम केले. पुन्हा निविदा काढतो. जेवढे लवकर करता येईल तेवढे लवकर केले. लेखा शाखेचे सपुर्ण कामकाज श्री.लोंढेवर अवलंबुन असते. श्री.लोंढे यांनी दोन तीन वेळा अकौंट विभागातुन इतर विभागात बदली साठी अर्ज दिला आहे. कॅफोची मागणी शासनाकडे केली आहे. हलगर्जीपणा केलेल्यांवर शोकॉज काढुन शिस्तभंगाची कारवाई करु.

**पान नंबर २४ वाचन सुरु अनुक्रमांक १ ते १४**

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सर्व कर वर्षा मध्ये जमा झाले पाहिजे. त्यापैकी किती जमा झाले. ७० पैकी किती जमा झाले.

**श्री.अनिल लोंढे :-** २८ कोटी ५३ लाख जमा झाले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कर वसुलीचे चार प्रभाग अधिकारी आहेत मागच्या अर्थसंकल्पाच्या वेळी डांगेसाहेब म्हणाले आम्ही ७० कोटी वसुल करु. अन्यथा कारवाई करु असे मागच्या सभेत डांगे साहेब म्हणाले होते. आपला वार्षिक खर्च कीती.

**श्री.अनिल लोंढे :-** महिन्याला १३ कोटी खर्च लागतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** २२ कोटी दर महिण्यास गरज आहे. परंतु महिन्याला दीड कोटी वसुल होत नाही. चार प्रभाग अधिका-यांवर काय कारवाई करणार आयुक्तांनी सांगावे. तुम्ही म्हणता मोठया थकबाकी दारांवर कारवाईचा बडगा उगारु मग केंव्हा बडगा उगारणार. तुम्ही काही कारवाई करणार की नाही. मागच्या वर्षी फक्त २६ कोटी वसुल झाले आहेत. उर्वरीत ४२ कोटी बाबत काय कारवाई करणार. १७० कोटीमध्ये परत ४० कोटी ॲड होणार. याचा कोणी गांभीर्याने विचार करणार की नाही. ४२ कोटी का वसुल केले नाही. ते जर वसुल झाले असते तर ठेकेदाराचे कामाचे बील देता आले असते. प्रभागात ठेकेदार कोणी काम करीत नाही. प्रभाग अधिकारी यांनी पुढे येवून मागणीनुसार वसूल का झाला नाही याचे कारण सांगावे. प्रभाग समिती क्रमांक १ ला बोलवा. त्यांचेकडून किती वसूल व्हायला पाहीजे, किती वसुल केले, किती कमी वसुल केले, वसुल का केले नाही. याबाबत माहिती देण्यांत यावी. नागरिक पैसे भरण्यास आल्यानंतर त्यांच्याकडून घरपट्टी भरुन न घेता पैसे घेतात त्यामुळे थकबाकी वाढली आहे.

**प्रभाग अधिकारी श्री.सारसर :-** ६६ कोटी मागणी पैकी २० कोटी वसूल झालेली आहेत. प्रभाग समितीत ३० कर्मचारी आहेत १४ लिपीक व २० बिगारी आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ४६ कोटी रुपये तुमचे मागच्या वर्षीची वसुल केली नाही. घरपट्टी हा महानगरपालिकेचा श्वास आहे. महानगरपालिकेचा तो जर श्वास गुदमरला तर महानगरपालिका मरुन जाईल. यांच्यावर काहीतरी जबाबदारी निश्चीत करा.

**प्रभाग अधिकारी श्री.सारसर :-** ५१ हजार मालमत्तांपैकी १४ हजार ओपन प्लॉट आहेत. तीन-चार झोपडपट्या आहेत. त्यामध्ये काही मोठे थकबाकीदार आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** तुम्हाला वसुल करता येत नाही का. यांच्यावर जबाबदारी निश्चीत करा. त्या शिवाय महानगरपालिका सुस्थितीत येणार नाही. प्रभाग अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चीत करा. कारवाई करा. त्यांच्या ऐवजी सक्षम अधिकारी नेमा. त्यांचेवर कंट्रोलिंगसाठी अधिकारी नेमा. पैसे जर जमा होणार नसतील तर काय कारभार करणार. आज चार प्रभाग अधिका-यांवर काय कारवाई करणार ते सांगा. सहाय्यक आयुक्त किती आहेत त्यांची जबाबदारी काय याची माहिती द्या. हे ज्याच्याकडे गेले तो म्हणतो हे घे ५ हजार बघू पुढच्या वर्षी २१-२२ या आर्थिक वर्षाचे येणे पोटी काय कारवाई करणार.

**मा.आयुक्त साहेब :-** वस्तुस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणतो. सन २०१८-२०१९ या साली ३५ कोटी, सन २०१९-२०२० या वर्षी २६ कोटी, सन २०२०-२०२१ या वर्षी २८ कोटी, सन २०२१-२०२२ ची नोव्हेंबर अखेर पर्यंत १५ कोटी वसुल आहे. मार्च पर्यंत २४ कोटी आहे. प्रभाग निहाय सर्वांच्या बैठका घेतल्या त्यात मुख्य कारण दिसुन आले जे लोक टॅक्स भरतात तेवढीच लोक भरतात. फेब्रुवारी मार्च मध्ये वसुली होते. लोकांना शास्ती दंड लागला होता ३ वेळा वर्षात ७५% शास्ती माफी दिली. किमान कोर्टातुन नोटीस दिल्या रिसपॉन्स दोन वेळा मिळाला. ब-याचशा तक्रारी लोकांच्या आहेत. ज्या समोर आल्या त्यापैकी काहींना बील गेलेले नाहीत. काहींचे म्हणणे एकदम बील आले. भाडेकरी घर सोडून गेला तरी भाडेकरी दराने टॅक्स येतो. त्यासाठी रिॲसेसमेंट करणे गरजेचे आहे. या सर्व समस्या असतांना सुध्दा बिगारी कर्मचा-यांना पदोन्नती देवून त्यांची जबाबदारी निश्चीत करण्यासाठी पदोन्नती निवड समितीच्या ४ बैठका घेतल्या. कमी वसुली असणा-या कर्मचा-यांना नोटीस दिल्या आहेत. शिस्तभंगाची कारवाई करु. निश्चीतपणाने रेकॉर्ड सर्वात कमी वसुली अधिका-यांना खुलासा मागवुन, शिस्तभंगाची कारवाई करु. ॲव्हरेज कमी असणा-यांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करु.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** यांचा सभागृहात प्रवेश व मा.महापौर यांना निवेदन दिले. निवेदनामध्ये वरिल विषयास अनुसरुन आपणांस माझा विरोध नोंदवत आहे की, महानगरपालिका झाल्यापासुन महत्वाचे विषयाची सभागृहात चर्चा न करता प्रोसेडींग मध्ये असे लिहीले जाते की, महापौरांना अधिकार देण्यांत आले आहे. परंतु दलित वस्ती असेल कींवा दलित वस्तीसारखे कामाचे इतर विषय असेल तर नंतर आम्हाला सांगण्यात येते की, महापौरांना अधिकार देण्यांत आले आहेत. परंतु महानगरपालिका अ धिनियम १९४९ मध्ये कुठेही महापौरांना अधिकार देण्यांत यावेत अशी कुठेही कायद्यात तरतुद नाही असे जे ठराव करतात ते बेकायदेशीर आहेत. व राहणार यापुढे असे कुठेही महापौरांना अधिकार देण्यांत येवू नयेत दिल्यास माझा विरोध नोंदविण्यांत यावा. असे बेकायदेशीर ठराव झाले तर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५१ खाली आयुक्तांनी शासनाकडे पाठवावे हे आयुक्तांचे कर्तव्य आहे व त्यांनी कर्तव्य पार पाडावे मा.आयुक्तांनी मी दिलेल्या पत्राची नोंद घ्यावी व ४५१ कलमाचे पालन करावे. सातवा वेतन आयोग लागू करा. आजच्या बोर्डात हे तुम्ही मंजूर करा.मी यापूर्वी ब-याच वेळा मागणी केली आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** सातवा वेतन आयोगाने महानगरपालिकांचा निर्णय घेवून दिड वर्ष झाले. नगरविकास विभागाकडे फाईल गेली आहे. महानगरपालिका स्तरावरचा विषय नाही. मा.शासनाची मंजूरी आल्यानंतर लागू होईल. दुसरा मुद्दा ७० कोटी वसुल म्हणालो हा महसुली जमा मधला भाग आहे. ५७ कोटी एकुण वसुली झाली आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ७० कोटी का वसुल झाले नाही. तुम्ही कराची फोड करुन सांगत आहात हे कर बीलात समाविष्ट करुन आलेले आहेत.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** भाडेक-यांच्या तक्रारी निकाली का नाही काढल्या.

**उपायुक्त श्री.डांगे :-** मागच्या वेळी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी सर्व कराची ५५ कोटी वसुल झ ाली होती. यावेळी ५७ कोटी वसुल झाले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मागच्या १७० कोटी रुपयांचे काय केले.

**मा.आयुक्त साहेब :-** ऑन पेपरवर या गोष्टी घेतल्या आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** थकबाकी दारांना ७५ % माफी दिली. ज्यांनी रेग्युलर भरले त्यांना परत देणार का. थकबाकी दारांवर कडक कारवाई करा. सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केलेला आहे. सदस्यांच्या काही भावना आहेत त्याचा आदर करा. मागच्या आर्थिक वर्षाचा विषय चालला आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** शिस्तभंगाची कारवाई निश्चीत करणार.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आपल्या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन हा अर्थसंकल्प मांडला आहे. त्याची ही अवस्था आहे. डीपीडीसी चे रोख बजेट ७० कोटीचे आहे. आपल्याकडे वार्षिक उत्पन्न किती, वार्षिक खर्च किती, शिल्लक किती राहीले. सर्वांना व्हीआरएस देवून टाका. त्यांना काम करायचे नसेल तर कसे होणार. आपण कुठेतरी संस्थेचे देणे लागतो. याचा विचार अधिका-यांनी करावा. आज प्रभाग अधिका-यांवर कारवाई करुन काय मिळणार २२० कोटी थकबाकीत गेले सन २०२२-२०२३ थकबाकी संदर्भात चांगले काम करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** काही नगरसेवकांनी प्रभाग निहाय जबाबदारी घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** प्रत्येक नगरसेवकाला किती तरतुद केली.

**श्री.अनिल लोंढे :-** मा.सदस्य प्रभाग स्वेच्छा निधी अंतर्गत १० लाख २३ हजार बजेटच्या २% तरतुद केली.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** गंभीर परिस्थीती आहे. वॉर्डात कोणीच काम या निधीतुन घेत नाही. वसुली झ ाली तर कामाचे देणी देता येतील. नागरीक आमच्याकडे आशेने पाहतात.

**मा.आयुक्त साहेब :-** वसुलीची जबाबदारी निश्चीत करणार आहे. ३१ मार्चची आकडेवारी आली की कारवाई करणार, वेतनवाढ रोखणार आहे. असे त्यांना कळविले आहे. बिगारी या पदावर असलेल्यांना प्रमोशन देणार आहे. एप्रिलच्या पहिल्या किंवा दुस-या आठवडयात पदोन्नतीचे आदेश काढणार आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मागचे सोडा या वर्षी कमी वसुल का झाली सांगा.

**मा.आयुक्त साहेब :-** प्रत्येक महिन्यात उद्दीष्टाची पूर्तता केली नाहीतर कारवाई करणार. प्रत्येक प्रभागात मी २-३ मिटींग घेतल्या आहेत. १००% कारवाई करणार.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मागच्या ठेकेदारांचे ४० कोटी देणे थकले आहेत.

**मा.महापौर मॅडम :-** काहीतरी कारवाई करु.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** वसुली केली पाहीजे नाही केली तर त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** २५ कोटी पुढचे वसुल झाले नाही. संबंधितांना जबाबदार धरुन कारवाई करा.

**मा.आयुक्त साहेब :-** मागचे कमी वसुली बाबत सुध्दा वेतन वाढ रोखण्याची कारवाई करु. चालू मध्ये जर सुधारणा झाली नाहीतर वेतनवाढ रोखण्याची कारवाई करु. वसुली केली नाहीतर एचओडी असेल प्रभाग अधिकारी असेल तर त्यांना निलंबीत करु.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** आक्टोबरच्या पहिल्या आठवडयात सभा घ्या म्हणजे कळेल.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** आपल्या शहरातील अनधिकृत बांधकाम, मोबाईल टॉवर्स यांचा सर्व्हे केला का. रेग्युलराईज केले का मनोरंजन कर वसुल केला का.

**प्रभाग अधिकारी श्री.सारसर :-** मालमत्ता करा संदर्भात वसुली लिपीक जावून मोजमाप घेवून आकारणी करतात. अनधिकृत बांधकाम संदर्भात कलम २२७ नुसार कारवाई करतो. मागील सहा वर्षाची आकारणी करतो. कायद्यात तशी तरतुद आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** अनधिकृत बांधकामाची कारवाई झाली पाहीजे. टॉवर्सवर कारवाई केली पाहीजे.

**प्रभाग अधिकारी श्री.सारसर :-** अनधिकृतचा टॉवर्स रेग्युलराईजचा विषय नगररचना विभागाकडे आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** टॉवर्सचा सर्व्हे झालेला आहे.

**मा.श्री.अशोक बडे :-** नागापूरचा विषय आहे. आपण त्यांना परवानगी देतो पण तो पैसे भरत नाही. त्यांनी रस्ते तोडले पण त्यांच्यावर कारवाई केली नाही.

**श्री.जोशी नगररचना विभाग :-** मोबाईल टॉवरचा सर्व्हे केला आहे. ३ वर्षापुर्वी सर्व्हे केला. २७५ च्या आसपास टॉवर्स आहेत. दंड भरुन पॉलिसीमध्ये ८० टॉवर्स दंड भरुन रेग्युलराईज केले आहेत.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** अनधिकृत टॉवर्स बंद केले पाहीजेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** रिलायन्स कंपनीने सर्व प्रभागामध्ये काम केलेले आहे. महानगरपालिकेकडे किती पैसे त्यांनी जमा केले. त्यांनी महानगरपालिकेकडे प्लॅन जमा केला असेल त्यावेळी किती पैसै भरले ते सागां.

**श्री.जोशी नगररचना विभाग :-** आता माहिती उपलब्ध नाही माहिती घेवून सांगतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** अनधिकृत टावर्सला नोटीसा काढा.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** यापुर्वी मोबाईल टॉवर्स वर कारवाई केली आहे. ५४ टॉवर सील करुन २ कोटी दंड वसुल केला आहे. मोबाईल कंपन्यांनी शासनाचे आदेशाविरुध्द कोर्टात धाव घेतली आहे. सुप्रीम कोर्टाने मोबाईल सेवा खंडीत करु नये असा आदेश दिला आहे. त्यामुळे कारवाई करता येत नाही. दंडात्मक कारवाई केली आहे. मोबाईल टॉवर्सचे पुन्हा नव्याने सर्व्हेक्षण करण्यांत येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कदम मॅडम असतांना मोबाईल टॉवर मधुन वसुल झालेल्या रक्कमेतुन ठेकेदाराचे देयक देवू असा ठराव झालेला आहे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** सर्वोच्च न्यायालयाने अनधिकृत टॉवर्सवर कारवाई करु नका असे सांगीतले आहे का. अनधिकृत टॉवर उभे करा असे म्हटले आहे का. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या नावाखाली दिशाभुल करु नका अनधिकृत टॉवर्स सील करा. कोणत्याही अनधिकृत टॉवरला सुप्रीम कोर्ट संरक्षण देणार नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** जी.ओ.कंपनीने परवानगी पोटी किती रक्कम जमा केलेली आहे.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** रिलायन्सचे दोन तीन प्रकारचे टॉवर आहेत. शासकीय कर्मचा-यांना मोफत नेटसुविधा देणार होते. जी ओ नी अंडरग्राउंड केबल संदर्भात ९६ लाख जमा केले आहे. किती काम झ ाले ते आपण मोजले नाही. मा.श्री.अशोक बडे व मा.श्री.सचिन शिंदे यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेवून कंपनीला नोटीस दिली आहे.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** कंपनीला व्याजाची आकारणी करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** टॉवरचे बाबतीत सुप्रीम कोर्टाने निकाल दिला किती कर आकारायचे हे आपण ठरवू शकतो. काही संस्था आहेत त्या महानगरपालिकेला टॅक्स मिळू शकतो. हे दाखवणार यासाठी खाजगी संस्था नेमू शकतो. आपण यावर लक्ष ठेवले पाहीजे. आपण जो टॅक्स लावतो त्याचे गणक काय आहे.

**रिव्हीजन विभाग प्रमुख श्री.सुनिल चाफे :-** मोबाईल टॉवर जिथे उभारला जातो त्या जागेचे मालक व मोबाईल कंपन्या यांच्या भाडेकरावर टॅक्स लावला जातो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** १५ दिवस स्टॅम्प डयुटी भरलेला करारच ग्राह्य धरला पाहीजे. टॉवरने किती जागा वापरली. सर्व्हीस काय देताल. त्यावर टॅक्स आकारला पाहीजे. एकएका टॉवरवर अनेक कंपन्यांचे युनिट लावले जातात. बाहेरच्या संस्थांना बोलावून घ्या. चालू झालेले टॉवर बंद करु शकत नाही. जो टॅक्स लागणार त्याचे वापरावर लावायचा. जे लोक वाणिज्य वापर करतात भाडेकरी ठेवतात त्यांचेवर योग्य आकारणी करा. प्रत्येक सभासद तळमळीन बोलतो. आजही चेक करा. आजच्या टॅक्सच्या ५० पट वसुल होवू शकतो. एकतर इमारत बांधकाम चालू असतांना लक्ष ठेवा. मुंबई महानगरपालिकेने १० बाय १० च्या खोलीकडून १ रुपया टॅक्स घेवू नका. असा निर्णय घेतला आहे. नोटरी स्टॅम्प डयुटी भरलेली असावी. १०० रुपये स्टॅम्पला व्हॅल्यू नाही. आपण गणक ठरवले पाहीजे. नागापूर व बोल्हेगांव एरीया करीता ५०० रुपये ठरविले आहे. सेवा देतात त्यावर टॅक्स लावू शकतो. ज्यांचा धंदा भाडेक-यावर आहे. त्यांना गणक लावले पाहीजे.

**मा.श्री.अशोक बडे :-** नागापूर बोल्हेगांव भागात ८-८ १०-१० वर्ष टॅक्स आकारणी साठी मिळकतीच्या नोंदी घेतल्या जात नाहीत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** भाडेक-यांचे जे गणक आहे त्यात बदल करणेची कारवाई करावी.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** अनधिकृत बांधकामाचा सर्व्हे झाला का.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** आम्ही संपुर्ण शहरातील मोबाईल टॉवर्सचे सर्व्हेक्षण हाती घेवून कायदेशीर मार्गाने कारवाई प्रस्तापीत करु. अनधिकृत बांधकामाचे संदर्भात प्रभाग अधिकारी यांना अधिकार प्रदान केलेले आहेत त्यांनी ते करणे अपेक्षित आहे व ते करतात. अनधिकृत गाळयांना नोटीस दिल्या काहींचे आदेश पारीत केले. काही कोर्टात गेलेले आहेत. नोटीसची मुदत संपल्यानंतर १ एप्रिल नंतर चारही प्रभागात टप्प्या टप्प्याने कारवाई करणार आहोत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** अनधिकृत बांधकामाचा सर्व्हे करुन रेग्युलराईज करण्याची कारवाई करा.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** नियमात बसणारे बांधकामे रेग्युलाईज करु शकतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** मनोरंजन कर ब-याच दिवसापासुन वसुल केला जात नाही.

**रिव्हीजन विभाग प्रमुख श्री.सुनिल चाफे :-** आता वसुली करीत नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** पुर्वी महसुल विभागाकडुन करमणूक कर वसुल केला जात होता राज्य चौदाव्या वित्त आयोगाने शिफारस केली त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांकडे तो दिला होता. परंतु अद्याप पर्यंत मनोरंजन कर स्थानिक संस्थांनी वसुल करणे संदर्भात निर्णय झालेला नाही तो विषय शासन स्तरावर प्रलंबित आहे.

**उपायुक्त श्री.डांगे :-** जीएसटी लागू झाला त्यावेळी तो रद्द केला.

**मा.आयुक्त साहेब :-** केंद्राने ज्यावेळी जीएसटी लागू केला त्यामध्ये केंद्राने काही कर रद्द केले आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** मेळा, प्रदर्शन, फनफेअर वगैरे लावतात त्यांचेकडून आपण कर वसूल करु शकत नाही का.

**मा.आयुक्त साहेब :-** महानगरपालिकेच्या जागेवर असेल तर जागा भाडे आपण वसुल करु शकतो.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** जागेचा कमर्शिअल वापर होत असेल तर त्यांचेकडून आपण कमर्शिअल दराने आकारणी केली पाहीजे. तात्पुरत्या स्वरुपात असेल तरी लावला पाहीजे. करोडो रुपये ते कमावतात.

**मा.आयुक्त साहेब :-** जाहीरात कर सुध्दा आपण घेत नाही.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** मोबाईल टॉवर्स व अनधिकृत बांधकाम सर्व्हेक्षण झाले का ?

**मा.श्री.येवले ज्ञानेश्वर :-** केडगांवला ५-६ दिवसांनी पाणी येते.

**मा.श्री.पठारे विजय :-** ड्रीम सीटीस पाणी दिले ते कोणत्या ठरावातुन दिले. वाचून दाखवा.

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** सन २०२०-२०२१ च्या महासभेत ठराव झाला आहे. ठरावाची कॉपी मागवुन घेतो.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** ठराव झाला पण कनेक्शन महानगरपालिकेने जोडले का ?

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय मीटर कनेक्शन जोडू शकत नाही.

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :-** आम्ही पत्र दाखल केले तरी पाणी पुरवठा सुरु केला आहे.

**मा.श्री.गणेश कवडे :-** पाणी पुरवठा प्रश्न फार गंभीर आहे. हे कनेक्शन तोडले गेले पाहीजे.

**जल अभियंता श्री.निकम :-** केडगांव पाणी पुरवठा बाबत जो विषय चालू आहे. ड्रीम सीटी संदर्भात यापुर्वीचे अधिकारी सातपुते यांना माहिती आहे. फाईल मागवुन घेतो. ठराव पाहुन घेतो.

**मा.श्रीमती.मालन ढोणे :-** वॉर्ड नंबर ९ मध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. पाण्याचे टायमिंग नाही. विस्कळीत आहे. पाणी अनियमीत येते हरीजन वस्ती सिध्दार्थनगर येथे ८-८ दिवस पाणी येत नाही.

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** जी लाईन जवळून गेली त्यातुन मीटर प्रमाणे कनेक्शन देण्याचा ठराव झाला आपण मीटर प्रमाणे पैसे आकारतो.

**मा.श्री.ज्ञानेश्वर येवले :-** तुम्हाला तोडता येत असेल तर तोडा. नाहीतर आम्ही तोडू.

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** मागे महासभेने निर्णय घेतलेला आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पूर्वीचा ठराव विखंडीत करा. पूर्वी जे ड्रीम सिटीस कनेक्शन दिले तिथे सर्व भाडेकरु आहेत. वाटेवरचे लोक राहतात. काही कारण नाही महापौर यांनी रुलिंग द्यावे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** महापौर काय रुलिंग देणार तुम्हाला जे मांडायचे ते सभागृहात मांडा व त्यानंतर त्यावर ठराव करा. लोक बाहेरचे आहेत तो विषय घेवू नका ते पण लोकच आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कोणत्या नगरसेवकाचे पत्र होते. कनेक्शन देणे संदर्भात अजेंडयावर विषय होता का ?

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** आता जर मीटर नसेल तर कारवाई करु. फोटो असतो. बील असते. दिनांक १८/०६/२०२० चे मा.बाबासाहेब वाकळे महापौर यांचे पत्र आहे. पत्र वाचन केले. दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या टिप्पणीचे वाचन केले. दिनांक २९/०४/२०२० प्रस्ताव क्रमांक ६ महासभा ठरावाचे वाचन केले.

**मा.श्री.ज्ञानेश्वर येवले :-** ठरावात उल्लेख या वेळेस गरज असेल त्यावेळेस कर भरण्यांत येईल असा होईल.

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** फेज - २ अमृत योजना पूर्ण होईपर्यंत असा उल्लेख आहे.

**मा.श्री.विजय पठारे :-** आयुक्त साहेब म्हणाले होते पाणी वाढवून देतो पण अजुन वाढवले नाही. मीटर सुध्दा बसवलेले नाही.

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** १ इंची कनेक्शन आहे.

**मा.श्री.विजय पठारे :-** आता केडगांवच्या पाण्याचे काय करणार ते सांगा. त्याशिवाय खाली बसणार नाही. अजेंडयावर विषय घेतलेला नाही. केडगांवच्या पाण्यातुन कनेक्शन घेवू देणार नाही.

**मा.महापौर मॅडम :-** ड्रीम सिटीचे पाणी कमी करुन ड्रीम सिटीला पाणी एक दिवसा आड करु.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** केडगांवचा पंपिंगचा टाईमिंग काय आहे.

**जल अभियंता श्री.निकम :-** केडगांवला दोन ठिकाणाहून पाणी पुरवठा आहे. मेन नागापूर पंपींग स्टेशन येथे २ मोटारी चालतात. त्याच ठिकाणावरुन सावेडी उपनगराला पाणी पुरवठा होतो. दुसरा वसंत टेकडी येथून ८ इंची पाईप लाईनव्दारे केडगांव इंडस्ट्रीयल इस्टेट येथे होतो.

**मा.श्री.विजय पठारे :-** पाईप लाईन फुटल्यावर ८-६ दिवस केडगांवला पाणी पुरवठा विस्कळीत होतो.

**जल अभियंता श्री.निकम :-** केडगांवसाठी नागापूर येथील दोन मोटारी खराब झाल्या त्यापैकी १ मोटार दुरुस्त करुन घेतली. यातच जुनी लाईन दोन वेळेस फुटली.

**मा.श्री. विजय पठारे :-** ड्रीम सीटी पाणी दिले. त्याचे काय करणार आम्ही पत्र देवून कनेक्शन तोडणार.

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** मेन लाईनला १ इंची टॅब दिला.

**मा.श्री.विजय पठारे :-** निंबळक पासून या लाईनवर छोटे - छोटे भरपूर कनेक्शन घेतले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पाणी पुरवठा अधिकारी समक्ष पाहणी करुन १ इंची पेक्षा जास्त असेल तर कट करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** काही आपण पालिकेच्या हद्दीबाहेर सुध्दा कनेक्शन दिले आहेत.

**मा.महापौर मॅडम :-** उद्या पाहणी करुन चुकीचे असेल तर कट करु.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** कल्याण रोडचा पाणीप्रश्न १४-१५ दिवसावर गेला त्याबाबत माहिती द्या.

**जल अभियंता श्री.निकम :-** कल्याण रोडला दोन ठिकाणाहून पाणी पुरवठा आहे तो डिस्ट्रब झाला आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** त्याठिकाणी नव्याने बांधकाम होतात. नविन घरांना पाणी पुरवठा एनओसी का देतो. नविन घरांना परवानगी का देतो. आपल्याकडे पाणी नाही मग परवानगी का देता. निकम साहेबांनी चार्ज घेतल्यापासुन पाणी पुरवठा ४-५ दिवसांवर आला होता.

**जल अभियंता श्री.निकम :-** वसंतटेकडी टाकीचे काम चालू आहे. पाणी पाहीजे तेवढे नविन टाकीत मिळत नाही. तांत्रिक दोष आहे. ते शाधण्याचे काम चालू आहे. युध्दपातळीवर काम चालू आहे.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** नविन टाकीला सरकुन चेंबर का टाकला नाही. मुकुंदनगरला तोच दोष आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** नविन टाकीचे काय नियोजन आहे.

**जल अभियंता श्री.निकम :-** नविन पंपाला दिवसाआड साधारणपणे ५ लाख लिटर पाणी घेवून ते उंच टाकीत घेवून वाटप करण्यांत येणार आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** कल्याण रोडचा विस्कळीत पाणी पुरवठा केंव्हा सुरळीत होईल त्यात तडजोड करु नका.

**जल अभियंता श्री.निकम :-** आम्ही लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करु. पहिल्या सारखा पाणीपुरवठा करु.

**मा.महापौर मॅडम :-** लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरु करा.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** नविन बांधकामाला बांधकाम परवानगी का देता.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्याकडे पाण्याचा फोर्स चांगला आहे. आपल्याला प्रॉब्लेम डिस्ट्रीब्युशनला देण्यास तांत्रिक कारण आहेत. धरणात पाणी आहे. विळदला पाणी येते. वसंत टेकडीला पाणी येते पण डिस्ट्रीब्युशन मध्ये प्रॉब्लेम आहे. तिकडे सुध्दा अनधिकृत बांधकाम करु शकतील.

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** नविन बांधकाम झाल्यानंतर त्यांना पाणी द्यायचे सोडून त्याचे एक धोरण ठरवा. नविन बांधकाम झाल्यानंतर त्यांना पाणी देता येत नसेल तर बिल्डींग परवानगी देवू नका. लाईट, ड्रेनेज द्यायचे कस बिल्डर बांधून जातो.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** बिल्डर नावाला चेंबर बांधतात लेव्हल नसते.

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** जिथे बेसिक सुविधा देवू शकतात तिथेच बांधकाम परवानगी द्या याबाबत निश्चीत धोरण ठरवा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** विकासक डेव्हलपमेंटचा चार्ज भरतो. विकासकाकडे त्याचा हक्क देतात परंतु मा.सभागृहास विनंती ले आउट टाकतांना पाणी लाईट खडीकरण याचा चार्ज भरतो परंतू ले-आउट धारक तो काम करतो हे सगळे पैसे आपल्याकडे भरुन घ्या. विकासक ज्यावेळी आजुबाजूचा परिसर डेव्हलप होतो त्यावेळी तेथे बांधकाम करतो. डेव्हलपमेंट चार्ज ले-आउटचा महानगरपालिकेकडे भरुन घ्या. ज्या वेळेस लोकवस्ती होईल त्यावेळी तेथे काम चालू करु त्यामुळे नगरसेवकावर आरोप येणार नाही. हे सगळे पैसे महानगरपालिकेकडे भरुन घ्यावे. असा ठराव करावा. डेव्हलपमेंट चार्जेस महानगरपालिकेकडे जमा करा. ज्यावेळेस लोकवस्ती होईल त्यावेळी काम करु. पूर्वी आपल्याकडे होते परंतु मध्यंतरी एक ठराव केला. डांबरीकरण करण्याची अट होती. तो आपण शासनाकडे पाठवला. शासनाने तो मंजूर केला. ले-आउट मंजूर त्याला करु द्या पण डेव्हलपमेंट चार्जेस महानगरपालिकेकडे जमा करुन घ्या त्याची एफ डी करा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** हा विषय तसेच मध्ये न घेता टी.पी. ची टिप्पणी येवू द्या. कायद्यात बसवून घ्या.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** ले आउट मजूर करतांना कोणत्या बाबी आवश्यक आहेत.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** शहराच्या हद्दीत असावी, एन.ए. असावी. त्या जागेवर आरक्षण काय, कोणती स्कीम करायची, हे पाहुन अगोदर तात्पुरती मंजूरी देतो. मोजणी खात्याचे लोक समक्ष पाहून ते मोजणी करुन नकाशा आपल्याकडे सादर करतात मग अंतिम मंजूरी देतो. दरम्यानच्या काळात विकासकाने पाणी, ड्रेनेज, रस्ते, गटर करायचे ते पाहील्यानंतर आम्ही सर्टिफिकेट देतो. मग अंतिम मंजूरी देतो.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** रस्त्याची काय अवस्था आहे. ड्रेनेज लाईन फुटते, झाकणे तुटतात, रोड खराब झाला की. लोक आमच्याकडे येतात. विकास कामाचे पैसे महानगरपालिकेकडे भरुन घ्या. ज्या ठिकाणचे पैसे भरतील त्याच ठिकाणी खर्च करु. अनिल शिंदे यांनी जे म्हणणे मांडले त्यास माझे अनुमोदन देतो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** आता घाई घाईत निर्णय घेण्यात येवू नये. अमृत योजना इतक्या दिवसात पूर्ण व्हायला पाहीजे पण ती पूर्ण झाली नाही. का झाली नाही.

**जल अभियंता श्री.निकम :-** अमृत योजनेमधील मुळानगर ते विळद पर्यंत पूर्ण झाली आहे. विळद पासून वसंत टेकडी पर्यत ५०० मीटरचे काम राहीले आहे. अडचणी सोडून काम करणे संदर्भात ठेकेदाराला सूचना दिल्या पण तो करत नाही. त्याचे कडे पाईप नाहीत.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** पंपाचे किती सोडायचे.

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :-** मागच्या सभेत ३ महिन्यात मोटारी येतील असे सांगीतले. त्याला आता किती दिवस झाले.

**इंजिनिअर श्री.सातपुते :-** ९ जानेवारीच्या सभेतील विषय आहे.

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :-** मोटारीला ऑर्डर दिली का.

**जल अभियंता श्री.निकम :-** मा.शासनाच्या मंजूरी शिवाय आपण मोटारची ऑर्डर देवू शकत नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** ५०० मीटर मध्ये एक कोर्ट केस होती आजच तारीख होती.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ते सोडून पाईपच पूर्ण क्षमतेने आले नाही असे निकम साहेब सांगतात नीट माहिती घ्या पाईप असतील.

**मा.आयुक्त साहेब :-** शासनाची मान्यता येणे गरजेचे आहे. मोटारची ऑर्डर दिलेली आहे. गेल्या गुरुवारी शासनाने मंजूरी दिली आपण आदेशाची वाट पाहत आहोत फाईल मान्यतेसाठी गेलेली आहे. आदेश दिल्यानंतर २ ते अडीच महिने लागतील.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** लवकरात लवकर करुन घेवू.

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :-** पंपाची ऑर्डर देवून टाका. चार-सहा महिने मोटारी बनविण्यासाठी लागतात.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** ५०० मीटर पाईप आले व मोटार बसविल्या तर पूर्ण शहराचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे का.

**मा.आयुक्त साहेब :-** आज शहराला जे पाणी धरणातुन उचलतो उद्या पाणी डबल झाले तसे डिस्ट्रीब्युशन सिस्टीम चांगली करावी लागणार आहे. यासाठी दोन महाराष्ट्र शासनाचे रिटायर्ड अधिकारी यांना सुधारणा दाखवून स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर केला आहे. १०० टक्के केंद्रसरकार यामध्ये पैसे देणार आहेत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** फेज-३ च्या योजनेत एरिया बाकी आहे. सर्व्हेत प्रत्येक एरिया घ्या.

**जल अभियंता श्री.निकम :-** ५६५ किलो मीटर काम झाले आहे. अतिरिक्त कामासाठी मा.स्थायी समिती सभेमध्ये सभापतींनी तरतुद केली आहे. २ कोटी आपण तरतुद करु. शहरातील जो जो भाग राहीला तो कव्हर करणार आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** महापौर मॅडम यांनी तरतुद वाढवून घ्यावी. भुयारी गटर योजनेत सर्व्हे करण्यांत काही भाग धरला नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** अमृत भुयारी गटर योजनेत संपूर्ण शहराचा भाग होता पण शासनाने मंजूर करतांना काही ठिकाणी लाईन धरलेल्या नाहीत. गरज आहे कि नाही ते पाहून घेवू.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** अमृत भुयारी गटर योजनेतील सर्व्हेचा जो भाग घ्यायचा राहीला तो घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** ढोबळ अंदाजपत्रक फेज-२ चा शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. ख्रिस्तगल्लीतील वस्तुस्थिती पाहून घेतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** ब-याचशा भागात जुने मळे-तळे आहेत. वस्ती तेथे रस्ता आला पाहीजे. मळयात जायच म्हटल तर त्या नागरिकांना मातीतुन जावे लागते. त्यांची मागणी येते. आमच्या कडे रस्ते का नाही करीत. ले आउट मजूर नाही असे महानगरपालिकेचे म्हणणे आहे. दोन रो-हौसिंग मधल्या भागात २५-३० वर्षापूर्वी ड्रेनेज लाईन टाकली त्या खराब झाल्या. त्या महानगरपालिकेने कराव्या. १००/- रुपये बॉन्डवर नागरिकांच्या स्वाक्षरी घ्याव्यात तसा ठराव करावे असे वाटते.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** दोन रो-हौसिंग मधील नागरिकांच्या स्टॅम्प पेपरवर संमती घेतल्या तर करता येईल. मध्यमवर्गीय लोक आहेत. पूर्वीच्या रो-हौसिंग आहेत.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** दोन्ही प्रश्न अत्यंत महत्वाचे आहेत.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** ड्रेनेजच्या समस्यां बाबत ७ घरांनंतर ब्रेक अप पाहीजे. रो-हौसिंग मध्ये दीड मीटर बांधकाम सोडायलाच पाहीजे. त्यावर बांधकाम केले. ड्रेनेज लाईन ठराविक काळानंतर खराब होते अशा वेळी साफसफाई करणे अडचणीचे होते. बांधकामामुळे व शेजारी ओपन प्लॉट असल्यामुळे काम करता येत नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मी रहात असलेल्या मागची लाईन खराब झाली आहे. ते लोक करुन देत नाहीत.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** लाईन टाकण्यासाठी सरकारी जागा पाहीजे. ड्रेनेज पाहीजे, आउट लेट पाहीजे, सेप्टीक बांधणे व त्याठिकाणी सोकपीट करणे हा पर्याय आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** ५०० स्क्वे जागा असेल त्याठिकाणी टँक कुठे बांधणार. सोकपीट कुठे बांधणार. आम्हाला महानगरपालिकेकडून परवानगी पाहीजे. ते कसे करायचे ते तुम्ही पहा. मला रस्त्यांसाठी परवानगी पाहीजे. शेतक-यांच्या सहया देतो. दोन्ही रो-हौसिंग मधून लाईन टाकणेसाठी त्यांच्या सहया घेवून देतो. त्याला तुम्ही परवानगी द्यायची.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** सावेडी गावठाणात खरेदी झालेल्या नाहीत.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** आपण एकत्र जमुन निर्णय घेवू. आमदार निधीतुन १००/- रुपये स्टॅम्प पेपरवर रोड लाईन टाकतो त्याच धर्तीवर हे विषय कसे मार्गी लावता येतील ते पहा.

**मा.श्रीमती.मालन ढोणे :-** महावीर नगर येथे मोठे रस्त्यात मोठे खड्डे पडले आहेत. एखादा अपघात होण्याची शक्यता आहे. अपघात झाला तर कोणाला जबाबदार धरणार. तरतुदी वाढविणे बाबत मी महापौर मॅडम यांना पत्र देत आहे.

पान नंबर २५ वाचन चालू. अनुक्रमांक १ ते २६

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** अ.नं.३ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे लायसन्स क्षेत्रामध्ये कोणते लायसन्स इशु करतात. कोणत्या दुकानांना कोणते लायसन्स दिले.

**मा.आयुक्त साहेब :-** शॉप ॲक्टचे लायसन्स असते. नगररचना विभागाकडून एनओसी दिली जाते.

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** किती लायसन्स दिले याची माहिती तुमच्याकडे नाही.

**मा.उपमहापोर श्री.गणेश भोसले :-** १५ मिनीटे झाले एक सन्माननीय सदस्य माहिती विचारत आहेत पण माहिती कोणीही देत नाही.

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** तीन अधिकारी तीन वेगळया प्रकारची उत्तरे देतात. आयुक्त साहेब एक व्यवसाय सांगतात. पठारे साहेब वेगळेच व्यवसाय सांगतात. डांगे साहेब वेगळेच विभाग सांगतात. नगरसचिव यांनी ॲक्टच्या पुस्तकातील कोणत्या दुकानांना परवानगी घेणे बंधनकारक आहे ते सांगावे. चिकन शॉप, मटन शॉप यांना कोणती परवानगी घ्यावी.

**नगरसचिव श्री.तडवी :-** ३८६ कलम मध्ये लायसन्स व परवानगीची तरतुदीचे वाचन केले.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** काकडे यांचेकडून माने यांचेवर कारवाई करु.

**मा.महापौर मॅडम :-** ज्यांचेकडून आकडे आले. चौकशी करुन कारवाई करु.

**मा.आयुक्त साहेब :-** कार्यालयांना लायसन्स घेणे बंधनकारक आहे ते घेतात.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कोणत्या व्यवसायाला लायसन्स घेणे बंधनकारक आहे ते निश्चीत करा. केअर टेकर कडे हे काम द्या.

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** इतर महानगरपालिकेकडून कोणत्या व्यवसायाला लायसन्स घेणे बंधनकारक आहे. कोणते रिन्युअल करणे बंधनकारक आहेत याची माहिती द्यावी.

पान नंबर २६ गाळा भाडे पुढे वाचन सुरु

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** गाळे धारकांकडून कोणत्या दराने भाडे आकारतो. जुन्या दराने आकारतो की रेडीरेकनरनुसार आकारतो किती गाळे आहेत.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :-** एकुण गाळे ८७३ आहेत. व्यापारी संकुल ३३ आहेत. गाळयांचे भाडे रेडीरेकनर नुसार ठरवले जाते. वसुल भाडे १ कोटी ३६ लाख

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** अपेक्षित किती.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :-** ३ कोटी दुकानदारांना रेडीरेकनर नुसार मान्य नसल्याने भरत नाही. काही कोर्टात गेले काही भरत नाहीत.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** किती वर्षापासुन एवढे गाळे आहेत. आपल्या किती जागा आहेत. तेथे गाळे बांधू शकतो का, उत्पन्न वाढू शकते असे एकाने तरी सांगीतले का.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :-** १० वर्षा पासुन आहेत.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** आयुक्त साहेबांनी पाहीलेले सावेडीतील एनसीसी ऑफीस भवन गाळे बंद आहेत तिथे सोर्स आहे. त्यांचे भाडे थकलेले आहे. तिथे काही करीत नाहीत तिथे कॉम्प्लेक्स होवू शकते. महानगरपालिकेच्या हजारो कोर्टाच्या प्रॉपर्टी आहे. माळीवाडयात चांगली जागा आहे.

पान नं १७-

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपण दुस-याच्या जागा पाडतो महानगरपालिकेच्या जागा संरक्षीत करा. महानगरपालिकेला उत्पन्न मिळेल. आधी मोठे मोठे हॉस्पीटल, हॉटेल पक्के बांधकाम पाडा गोरगरीब व टप-या धारकांवर काय कारवाई करता. मुळात गाळयांवर कारवाई करण्यापेक्षा पक्के बांधकाम पाडा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** मुंबई महानगरपालिकेने ज्या पध्दतीने टॅक्स माफ केला त्या धर्तीवर अहमदनगर महानगरपालिकेने माफ करावा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** नागरी आरोग्य केंद्रातील महिला कर्मचा-यांना वाटपासाठी कॅलशियमच्या गोळया मिळत नाही. नागापुर बोल्हेगाव या भागात गोरगरीब, कष्टकरी समाज राहतो. आमचे म्हणणे की आमचे चुकत असेल तर ते सांगा एखादयाला रस्त्यावर बसणा-या विक्रेत्याकडुन जर विषबाधा झाली तर कोणाला जबाबदार धरायचे. बांधकाम पाडताना सर्वांना टेप लावा.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ३०० ते ४०० स्वेअर फुट पर्यंत जर घरपट्टी माफ केली तर बरे होईल.

**उपायुक्त श्री.डांगे :-** मुंबई महानगरपालिकेकडे ९३००० हजार कोटी बजेट आहे. आपल्या महानगरपालिकेची परिस्थीती तशी नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** आपल्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारा व गोरगरींबांना लाभ दया.

**उपायुक्त श्री.डांगे :-** १० ते १२ वर्षे झाली रिव्हीजन झालेले नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** सर्वांची मिटींग घेवु. त्याच विषयावर चर्चा करुन निर्णय घ्यावा लागेल. आर्थिक विषय आहे त्यामुळे चर्चा करुन निर्णय घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** महानगरपालिकचे २५०० ओपन स्पेस आहेत. त्यापैकी ५० ते १०० चांगल्या ठिकाणचे निघतील. मी याबाबतची माहिती माहितीच्या अधिकारात नगररचना विभागाला मागीतली परंतु अदयाप ती मला मिळालेली नाही. महानगरपालिकेचे ओपनस्पेस वर जर एखादे कॉम्प्लेक्स बांधले तर कोटयावधी रुपये जमा होतील. इथापे साहेब यांनी कापडबाजारातील श्वास मोकळा केला त्या बददल अभिनंदन. मी काही गोष्टी निदर्शनास आणतो महानगरपालिकेच्या रस्त्यावर पक्के बांधकाम केले आहेत. तक्रारीचे निवारण केले जात नाही. कोर्टात जाण्यासाठी आपण त्यांना प्रवृत्त करतो. आतापर्यंत कोणी उत्पन्नाचे स्त्रोत सुचविले नाही. मला आपल्या ओपन स्पेसची यादी दया मी त्यापैकी चांगले स्पॉट सुचवतो. त्या ठिकाणी कॉम्प्लेक्स बांधु शकतो. ८१० कोटीचे बजेट वास्तव आहे का ? वास्तविकता हि आहे की शासनाचा जो निधी येतो तो या ठिकाणी जमा बाजुस दाखवला आहे. आपल्याला देण किती लागतो याचा विचार कोणी करीत नाही. १९ फेब्रुवारी च्या आत कर-दर वाढीचे बजेट मंजुर व्हायला पाहिजे. आस्थापना खर्च कमी करायला पाहिजे. चतुर्थ श्रेणीचा खर्च बजेटमध्ये धरायला नको पण तो या ठिकाणी धरला जातो. पाणीपुरवठयाचा प्रश्न आहे. आउटसोर्सींगव्दारे लोक घेतले त्यांना टेक्नीकली माहीती नाही. आकृतीबंधाला आस्थापना खर्चामुळे मंजुरी मिळत नही. २३०० कर्मचा-यांपैकी ७०० सफाई कामगार आहेत. उत्पन्न वाढीसाठी कोणी काही करीत नाही. चारठाणकर साहेबांना बोलवुन घ्या ते या क्षेत्रात काम करतात. आस्थापना खर्च कमी झाला नाही तर कुठलेही पद आपण भरु शकत नाही. नगर हे मोठे खेडे म्हणुन या शहराची ओळख आहे. भुयारी गटार योजनेतील पाईप टाकल्यानंतर खाली काय टाकायला पाहिजे, ज्या पध्दतीने काम व्हायला पाहिजे त्या पध्दतीने चालते का ? तसे जर होत नसेल तर संबधीताच्या बीलातुन पैसे कपात केले पाहिजे. रस्ता पुर्ववत करुन दयायची जबाबदारी त्या ठेकेदाराची आहे. चितळेरोड,आनंदीबाजार,दाळमंडई या रस्त्याची परिस्थिती पहा. त्या रस्त्याचे टेंडरमध्ये अटी शर्ती नियम काय आहेत. त्या नियमानुसार काम करुन घ्या. कोणला तरी काम दिले आहे त्याने खडी टाकली मुरुम टाकला पण रस्ता ज्या ठिकाणी खोदला होता त्याच ठिकाणी पुन्हा खचला आहे. सफाई कामगार रिटायर झाल्यानंतर तुम्ही कोणाला घेणार सगळ आउटसोर्सींग करणार. तो खर्च आपल्याला दयायला परवडतो का? उत्पन्नाचे मार्ग शोधा या शहराला काहीच मिळेना. गाळेधारकांचा प्रश्न ऐरणीवर पडला आहे. त्यांचे कडून ८ ते ९ कोटी मिळतील. आपण मागे ठराव केला काहिंनी गाळे विकले आहे ज्या मुळ मालकाच्या नावावर गाळा आहे तो भाडे घेवुन जातो. गाळे हस्तांतरण पोटी महानगरपालिकेस ८ कोटी गाळे धारकांकडुन मिळु शकतात. गाळा हस्तांतर करुन दयायचा ठराव केला आहे. छोटया गाळेधारकाकंडुन ३० हजार तर मोठया गाळेधारकाकडुन ६० हजार घेवुन हस्तांतरण करुन दया. महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळेल किती दिवस हे चालायचे आपण चांगले अधिकारी आहात.

**मा.श्री.गणेश कवडे :-** या अर्थ संकल्पाच्या सभेमध्ये आज सकाळ पासुन विविध व्हॉटसअप ग्रुप असेल, विविध माध्यमावर या अर्थसंकल्पावर चर्चा होत आहे. संपुर्ण व्यापारी लोक नवीपेठ येथे उपोषणाला बसले आहेत. संपुर्ण नगर शहरातील जनतेची दुकानदारांची मागणी हि आहे की त्यांचे दुकानासमोर अडथळे आणातात. महिलांना व्यवस्थीतपणे चालता येत नाही. व्यापा-यांना व्यवसाय करता येत नाही. आयत्या वेळचा विषय घेवुन त्या ठिकाणी व्यवसाय करणा-यांना कुठेही जागा दया. व्यापारी पेठेचा श्वास मोकळा केला पाहिजे. नागरिकांची घुसमट बंद केली पाहिजे. आयत्या वेळचा विषय घेवुन व्यापा-यांना पाठिंबा दिला पाहिजे. सभागृहाची विनंती की आयत्या वेळचा विषय घेवुन रुलींग दयावे.

**शहर अभियंता श्री इथापे :-** बाजारपेठेत गेल्या १५ दिवसापुर्वी व्यावसायिक व हातगाडी वाल्यांसोबत वाद झाला. आम्ही मोहिम घेवुन सातत्याने कारवाई केली आहे. कर्मचारी कमी आहेत अतिक्रमण हटवण सोप

नाही. आज जरी व्यापारी उपोषणाला बसले. आजही बाजारपेठैत कुणीही हॉकर्स आला नाही. कायदयाचे बंधन आमच्यावर आहे. २०१४ साली हॉकर्स पॉलीसी केंद्राने जाहिर केली आहे. शहरात हॉकर्सचे सर्व्हेक्षण केले आहे. २८४८ हॉकर्स आढळुन आले आहे. हॉकर्स वाल्यांचा विचार करावा लागेल. आमची कारवाई पुढे नियमीत चालु राहिल.

**मा.श्री.गणेश कवडे :-** टॅक्स व्यापारी भरतात त्याचें या शहरासाठी मोठे योगदान आहे. हॉकर्स बदद्ल आमचे काही मत नाही. बाजारपेठेतला श्वास मोकळा झाला पाहिजे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** बाजारपेठेत अतिक्रमणाबाबत विरंगुळा मैदान व अमरधाम शेजारील जागा या पुर्वी साफ करुन दिली होती का ?

**शहर अभियंता श्री.इथापे :-** महानगरपलिकेमार्फत अतिक्रमण हटविण्यात आले त्यावेळी काही व्यावसायीकानी नामदार हायकोर्टात धाव घेतली होती. नामदार हायकोर्टाने त्यावेळी फेरीवाल्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन दया असे सांगीतले. शरण मार्केट मधील गाळेधारकांचे पुनर्वसन केले होते या व्यावसायीकांसाठी आमच्या कडे सर्वेक्षण केलेले आहे. बेग पटांगण,अमरधाम,येथील जागा आमच्या समोर आहेत. आपण सर्व जण बसुन तोडगा काढावा लागेल असे माझे वैयक्तीक मत आहे.

**मा.श्री.गणेश कवडे :-** बाजारपेठेतुन आपली यंत्रणा त्या ठिकाणाहुन निघुन गेल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रण लावण्यात येते. आपल्याला एखादी जेसीबी ठेवता येईल त्याव्दारे त्याचे माल नष्ट करता येईल जेणेकरुन पुन्हा त्या ठिकाणी कोणी उभे राहणार नाही. आपण सर्वांनी व्यापा-याना पाठिंबा दयावा. व आयत्या वेळच्या विषयात विषय घेवुन ठराव करावा, महापौरांनी रुलींग दयावे.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** हॉकर्स झोन निश्चीत होत नाही तोपर्यंत काही करणार नाही का ?

**शहर अभियंता श्री.इथापे :-** हॉकर्स पॉलीसी मोठी आहे पुन्हा प्रोसेस आम्ही सुरु करीत आहोत.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** महिलांची बाजारपेठेत छेडछाड होते. पाकिटमार होते. एखादयावेळी दोन गटात दंगल होवु शकते. बँकेचे व्याज व्यापारी भरतात. कायदा व सुव्यवस्था कोठे चालली आपण या नगर शहराचे नागरीक आहोत.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** तीच परिस्थीती उपनगरात येईल बिल्डीग समोर कुठेही हातगाडी लावतात. उपनगरात पुतळे आहेत, मंदिर आहेत मटन विक्रेत्यांच्या टप-या रस्त्याच्या कडेला लावतात आसपास त्या ठिकाणी हाडक टाकतात.

**मा.श्री.गणेश कवडे :-** कुठल्याही प्रकारची हातगाडी मोचीगल्ली,कापडबाजार , घासगल्ली, कापडबाजार येथे लावु देवु नका. कुमार भाउनी सांगीतले त्या प्रमाणे गाडी जर लावली तर त्यांचेवर पाण्याची फवारणी करा.

**मा.उपमहापौर श्री. गणेश भोसले :-** महापौर मॅडम यांनी सांगीतले त्याप्रमाणे संयुक्त बैठक लावुन चर्चा करु

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आज तिथे कुठलीही हातगाडी लागता कामा नये. अतिक्रमण विभाग प्रमुखांना पोलीस बंदोबस्त मिळाला पाहिजे

**मा.सौ.शिला चव्हाण :-** सन २०२२-२०२३ चे बजेटमध्ये ७ वे वेतन आयोगा संदर्भात तरतुद केली का?

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :-** ७ वे वेतन आयोगा संदर्भात सन २०२२-२०२३ चे बजेटमध्ये तरतुद केली आहे.

**मा.सौ.शिला चव्हाण :-** माझ्या प्रभागात काही घरामध्ये पाणी शिरते. त्या ठिकाणी पाईप टाकावे लागणार आहे. याबाबत इंजिनिअर निंबाळकर यांना अनेक फोन केले पण ते पाईप त्या ठिकाणी टाकत नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसेले :-** आठ दहा दिवसात काम संपवा छोटा विषय आहे.

पान नं २७

**मा.श्री.गणेश कवडे :-** कल्याण रोडला स्लॉटर मार्केट झाले आहे त्यांचेकडुन महानगरपालिकेची फी वसुल करतो का ?

या दुकानांमुळे रविवार ,बुधवार, शुक्रवारी अमरधाममध्ये कावळे येत नाही. दशक्रिया विधी करणे कठीण झाले आहे.

**मार्केट विभाग प्रमुख दिपक सोनवणे :-** गुंजाळ हा कर्मचारी या परिसरासाठी नेमला आहे.

**मा.श्री.गणेश कवडे :-** कल्याण रोडवरील मटनाची दुकाने बंद करुन टाका. दशक्रिया विधीला अडथळा येतो त्यांना त्या ठिकाणी व्यवसाय करण्यासाठी मज्जाव करा.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** अमरधाममध्ये दशक्रिया विधी झाल्यानंतर घास देण्यासाठी एक गाय ठेवली होती ती कोंडवाडा करुन घेवुन गेले असे सांगतात. सावेडी मार्केटची परिस्थीती तशीच आहे उपनगरात एक मार्केट करा.

अनुक्रमांक १ ते ४४

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** गुंठेवारी विकास नियमीत करणे तरतुद केली आहे गुंठेवारी चालु आहे का ?

**सहा.नगररचनाकार वैभव जोशी :-** गुंठेवारी योजना चालु आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** किती प्रकरण आहेत. किती लेआउट आहेत. किती दिवसात मंजुर करतो. हे प्रकारण गतिमान केले तर महानगरपालिकेला मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळेल. गुंठेवारीची प्रकरणे लवकरात लवकर मार्गी लावा. ले-आउटची किती प्रकरणे प्रलंबीत आहे त्याची माहिती दया.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** उपनगरात,शहरात जे ओपनस्पेस आहे त्याला कंपौड नाही वादातील प्लॉट ओपन स्पेस वर टाकले जातात संबधीत जागा मालक नगरसेवकाला बोलवतात. महानगरपालिकेच्या ओपनस्पेसवर कोणतेही बांधकाम होवु नये यासाठी दक्षता घेणेचे काम महानगरपालिकेचे आहे. दुसरी गोष्ट ड्रेनेज लाईनची कामाबाबत, ड्रेनेजलाईनला लेव्हल अजिबात नसते काही ठिकाणी काळी माती असते त्यामुळे जड वाहनामुळे लाईन खचते व पाणी रस्त्यावर येते नागरिक आमच्या कडे तक्रार घेवुन येतात. रस्ते दर्जेदार नसतात. बांधकाम परवान्याचे वेळी आकारले जाणारे विकास शुल्क जर महानगरपालिकेकडे जमा केले तर महानगरपालिकेच्या इंजिनिअर्स मार्फत चांगली दर्जेदार काम करता येतील. ज्या वेळैस ते लेआउट आपल्याला हस्तांतर करतील त्यावेळी कंपोड करता येईल. काम केल्यासारखे दाखवतात पण काम त्या दर्जाचे होत नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आपण या विषयाबाबत अजेंडयावर विषय घेवु व सभागृहात ठराव घेवु.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** कोवीडमध्ये महानगरपालिकेच्या शाळा बंद होत्या विदयार्थ्यांना आधुनिक दर्जेदार शिक्षण सुविधा मिळाल्या पाहिजे. त्यासाठी तरतुद ठेवली आहे का ? यासाठी काय करणार.

**मा.श्री. महेंद्र गंधे :-**आनंदीबाजार येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी शाळेत ४-५ कुटुंब बरेच वर्ष झाली फुकट राहतात त्यांचेकडुन जागा खाली करुन घ्या. ते इतरांना भाडे तत्वावर देता येईल.

**शिक्षणाधिकारी मनपा शिक्षण विभाग श्री.थोरात :-** पुर्वी कर्मचारी असल्याने त्यांना खोल्या देण्यात आल्या होत्या. कुठलाही ठराव वगैरे झालेला नाही.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मा.महापौर यांनी पाहणी करावी. बरेच वर्षे झाले ते राहात आहेत.

**मा. उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** नोटीस दया व जागा खाली करुन घ्या इतरांना ती भाडेतत्वावर भाडयाने देता येईल

**शिक्षणाधिकारी मनपा शिक्षण विभाग श्री.थोरात :-** कदम मॅडम यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माहिती की, या अदांजपत्रकामध्ये शाळांसाठी संगणक साहित्य खरेदीसाठी ३० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. शाळा दुरुस्तीसाठी तरतुद केली आहे. महानगरपालिकेच्या १२ शाळा आहेत वर्ग खोल्या १८३ आहेत त्या पैकी ७८ खोल्यांचा वापर होतो. २३ खोल्यांची किरकोळ दुरुस्ती करावी लागेल.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** शाळांची किरकोळ दुरुस्ती व संगणक वगैरे बसवायचे त्यासाठीची तरतुद वाढविण्यात यावी.

**शिक्षणाधिकारी मनपा शिक्षण विभाग श्री.थोरात :-** २० लाख रु इ लर्निंग व ३० लाख शाळा दुरुस्तीसाठी तरतुद ठेवली आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** ब-याचशा शाळा मोडकळीस आल्या आहेत. ज्या शाळांमध्ये विद्यार्थी आहेत त्या दुरुस्त कराव्या. ज्या शाळांत विद्यार्थी नसतील तर इतर संस्थांना चालवायला द्या. महानगरपालिकेचे नांव राहील. वास्तु टीकतील.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** माणिकचौकात किती खोल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी मनपा शिक्षण विभाग श्री.थोरात :-** ९ खोल्या आहेत. त्यापैकी ६ खोल्या दिल्या आहेत. ३ खोल्यात सामान ठेवले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सगळया विषयांवर साधक बाधक चर्चा झाली. अहमदनगर महानगरपालिकेस मा.शासनाकडून विविध योजने अंतर्गत प्राप्त होणारा निधी, जिल्हा नियोजन कडून विविध योजनांकरीता मिळणारा निधी, महानगरपालिका निधी या महानगरपालिकेस प्राप्त होणा-या निधीतुन कामे सुचविण्याचा अधिकार मा.महापौर मॅडम यांना देण्यांत यावा. मी महानगरपालिका निधीमध्ये वाढ करणे बाबत मा.महापौर यांचेकडे पत्र देत आहे.

**मा.श्री.गणेश कवडे :-** या सूचनेस मी अनुमोदन देत आहे.

**मा.महापौर साहेब :-** इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येत आहे.

---*---

## मा.महापौर मॅडम यांचे मनोगत, नमस्कार

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री विशाल गणपती व महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी, सातारा येथील मांढरादेवी, संत ज्ञानेश्वर महाराज, जगतगुरू संत तुकाराम महाराज व राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे प्रेरणेने तसेच हिंदू हृदयसम्रा बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शिवादाने, माजी मंत्री स्व.अनिल भैय्या राठोड यांचे विचाराने शहराच्या विकासासाठी व नागरिकांना नागरी सुविधा देण्यासाठी पंतप्रधान मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब,राज्याचेमुख्यमंत्री मा.ना.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब,

उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब, माजी केद्रीय मंत्री मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब, नगरविकास मंत्री मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब, अहमदनगर जिल्हा पालकमंत्री मा.ना.श्री.हसनजी मुश्रीफ साहेब, महसूल मंत्री मा.ना.श्री.बाळासाहेब थोरात साहेब, जलसंधारण मंत्री मा.ना.श्री.शंकरराव गडाख साहेब, नगरविकास राज्यमंत्री मा.ना.श्री.प्राजक्त तनपुरे साहेब, मा.खा.डॉ.श्री. सुजयजी विखे पा.साहेब, माजी आ.श्री.अरूणकाका जगताप साहेब, मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब, मा.आयुक्त श्री शंकर गोरे, अतिरिक्त आयुक्त डॉ.प्रदिप पठारे, सर्व उपायुक्त महानगरपालिकेचे कामकाज करताना मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले, मा.स्थायी समिती सभापती श्री.कुमार वाकळे, सभागृह नेते श्री.अशोक बडे, महिला व बाल कल्याण समिती सभापती सौ.पुष्पाताई बोरुडे, उपसभापती सौ.मीनाताई चोपडा, विरोधी पक्ष नेते श्री.संपत बारस्कर सर्व नगरसेवक नगरसेविका आपले मार्गदर्शन व सहकार्य तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कामकाज करताना सर्वतोपरी सहकार्य मला मिळत आहे. महापौर पदाचा पदभार घेतल्यापासून महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्याचा प्रयत्न करित आहे. मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन 2022-2023 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक घेवून आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरिकांना नागरी सुविधा देताना शहर व उपनगराच्या विकासाच्या दृष्टीने व आपणा सर्वाच्या सहकार्याने शहराचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी, महानगरपालिकेचा इतर खर्च कमी होण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहे.

- शहर स्वच्छते साठी सर्वोतोपरी प्रयत्न करित असून यामध्ये विविध सामाजिक संघटना, संस्था, स्वच्छता दूत, पर्यावरण दूत, शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लासेस यांच्या माध्यमातून व नागरिकांच्या सहकार्याने शहर स्वच्छ व सुंदर करण्याचा प्रयत्न करणार आहे.
- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची इमारत जूनी झाली असून त्याच ठिकाणी नविन अद्यावत सुविधेसह नविन इमारत बांधण्यासाठी मा.शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे.
- कल्याण रोड परिसरातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टिने गणेश नगर मध्ये संपवेल बांधण्यात आला असून यासंपवेलमुळे परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.
- नगर कल्याण रोड परिसरातील 1) प्रभाग क्र. 8 मधील अनुसया नगर ते सिना नदी पर्यंत डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे 2) प्रभाग क्र. 8 मधील कल्याण रोड आदर्श नगर गणपती मंदिर ते शेंडगे घर ते बारवे घर, वाव्हळ घर ते धन्वंतरी बंगला पर्यंत डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे 3) प्र.क्र. 8 मधील विद्या कॉलनी शहा घर ते पंधारे घर ते वाव्हळ घर ते गाडळकर मळा पर्यंत चा डीपी रस्ता कॉक्रीटीकरण करणे या डीपी रस्त्यांसाठी मा. राज्य शासनाने 20 कोटींचा निधी मंजूर केला आहे. या रस्त्यांच्या कामामुळे कल्याण रोड परिसराचा विकासाचा अनुशेष भरुन निघणार आहे.

- इलेक्ट्रीक वाहनांची भविष्यातील वापराचा विचारकरता महानगरपालिकेची जागा चार्जिंग पॉईं□ साठी भाडेतत्वावर देवून महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष□ीने प्रयत्न करणार आहे.
- शहर सौदर्यात भर पडण्यासाठी शहर व उपनगरातील छो□ मोठे चौक सुशोभिकरण, रस्त्याच्या मधोमध डिव्हायडर □ाकून सुशोभित करण्यासाठी खाजगी कंपनी, संस्था यांच्याकडून निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू आहे. प्रशासनाने देखील याबाबत कार्यवाही करावी.
- चितळे रोड येथील नेहरू मार्के□च्या जागी शॉपिंग कॉम्प्लेक्स व सावेडी शॉपिंग कॉम्प्लेक्स महानगरपालिकेच्या माध्यमातून बांधण्यात येणार आहे. सदर इमारतीचे बांधकाम झाल्यास शहरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होवून महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील वाढ होईल.
- शहरातील ओढे नाले सुशोभिकरण करण्यासाठी खाजगी व सामाजिक संस्था यांचेकडून मदत घेवून ओढे,नाले व परिसर सुशोभित करण्यात येईल त्यामुळे शहर सौदर्यात भर पडेल.
- उपनगरासाठी आवश्यक असणारी शहरी भुयारी ग□र योजना □प्पा 2 मा.शासनाकडे मंजूरी साठी प्रस्ताव सादर केले आहे. त्यामुळे उपनगरातील ड्रेनेज लाईनचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.
- शहर व उपनगरात डिजी□ल जाहिरात बोर्ड लावून यामाध्यमातून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यात येईल.
- अहमदनगर महानगरपालिकेच्या पिंपळगांव माळवी येथील जागेत महानगरपालिकेचे उत्पन्नाचे दृष्टिने फिल्म सि□ी सारखा प्रकल्प उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू आहे. या बाबत प्रस्ताव करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. सदर प्रकल्पामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.
- पिंपळगाव माळवी येथील तलावामध्ये बो□िंग सुरु करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.
- महानगरपालिकेच्या जागेत व्यवसायिक इमारत बांधणे , गाळे बांधून भाडे तत्वावर देवून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणार आहे.त्यामुळे रोजगार देखील निर्माण होईल.
- अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा विषयक कामातील पाईप लाईन □ाकण्याच्या कामात येणा-या अडचणी बहुतांश सोडविण्यात आल्या व कामास गती देण्यात आली. मे अखेर सदर पाण्याची पाईप लाईन □ाकून पूर्ण होईल या पाईप लाईनद्वारे विळद पंपींग स□ेशन येथे पाणी साठवणुक करून शहरामध्ये नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक व सुरळीत देण्याचा प्रयत्न आहे.
- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 योजनेच्या कामाबाबत वारंवार बैठका घेवून झोननुसार काम पूर्णकरुन अशा झोन मध्ये तातडीने पाणी पुरवठा वितरणाबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

- महिलांसाठी विविध योजना / सांस्कृतिक कार्यक्रम / प्रशिक्षण / शिबीरे आयोजित करुन महिलांना सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करणार आहे.
- नाट्यगृहाचे काम प्रगती पथावर आहे. नाट्यगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन नाट्य रसिकांसाठी नाट्यगृह खुला करण्याचा प्रयत्न करणार आहे.

सन 2022- 2023 चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने तयार करून मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीमुळे शहराच्या विकासासाठी मा.शासनाकडे निधी मिळणे कामी मागणी करण्यात आलेली असून मा.शासनाकडून निश्चितपणे निधी उपलब्ध होणार आहे. यामाध्यमातून शहराचा चेहरा बदलण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या सर्वाचा विचार करून या शहराचे नागरिक निश्चितपणे महानगरपालिकेस सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. तसेच आपल्या सर्वाचे मार्गदर्शन व सहकार्य याची अपेक्षा करित असून ते आपणा सर्वांकडून निश्चित मिळेल या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार बंधू व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले त्याबद्दल अभार.

जय हिंद जय महाराष्ट्र

**सही/-**
रोहिणी संजय शेंडगे
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

---*---

**<u>ठराव</u>** -

सन 2021-2022 चे जमा व खर्च बाजूमध्ये सुधारित व सन 2022-2023 चे अंदाजपत्रकाबाबत मा.स्थायी समितीने केलेल्या सुचना, दुरूस्त्या व फेरफार व शिफारशीसह तसेच मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व दिलेले पत्र तसेच दुरूस्त्या फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे.

- छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले याचा पुर्णाकृती पुतळा, छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे बाबत लवकरात लवकर कार्यवाही होण्याच्या दृष्टिने प्रशासनाने कार्यवाही करावी.
- महासभेत झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिका क्षेत्रात नविन बांधकाम झालेल्या व जास्तीचे बांधकाम झालेल्या मालमत्ता धारकांचे नोंदणी करून त्यांना कर आकारणी करण्यात यावी. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल सर्वसाधारण कर या लेखाशिर्षात रक्कम रु. 3 कोटी 62 लाख 99 हजाराने वाढ करण्यांत यावी.
- गाळे भाडे या लेखाशिर्षात रक्कम रु. 50 लाख तरतुद वाढविण्यांत यावी.

- महानगरपालिका हद्दीतील नळ कनेक्शन धारकांकडून पाणी पट्टीची वसुली मोहिम राबवून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करुन नळ धारकांकडुन जमा पाणीपट्टी या लेखाशिर्षात रक्कम रु.1 कोटी 40 लाखाने वाढ करण्यांत यावी.
- महानगरपालिके मार्फत ग्रामपंचायत, संस्था इत्यादींना मीटरव्दारे पाणी पुरवठा करण्यांत येतो याची थकबाकी मोठया स्वरुपात असल्याने संबंधितांना पत्र व्यवहार करुन थकीत पाणीपट्टी वसुली करण्यांत यावी. मीटरव्दारे मिळणारे उत्पन्न या लेखाशिर्षात रक्कम रु. 1 कोटी 53 लाखाने वाढ करण्यांत यावी.
- आपत्कालीन व्यवस्थापन खर्च ( बांधकाम ) या लेखाशिर्षात रक्कम रुपये 38 लाखांची तरतूद वाढ करण्यांत यावी.
- अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ शाळा दुरुस्ती लेखाशिर्षात रक्कम रुपये 10 लाखांची तरतूद वाढ करण्यांत यावी. तसेच ई लर्निंग सुविधा लेखाशिर्षात रक्कम रुपये 10 लाखांची तरतूद वाढ करण्यांत यावी.
- विकास योजना जी आय एस बेस सुधारित करणे या लेखाशिर्षात रक्कम रुपये 25 लाखांची तरतूद वाढ करण्यांत यावी.
- गरीब व गरजु रुग्णांना उपचार व शस्त्रक्रीयेसाठी दिल्या जाणा-या निधीसाठी महापौर वैद्यकीय सहाय्यता निधी असे लेखाशिर्ष आहे. बॅंकेत खाते उघडतांना महापौर विधायक कार्य निधी असे नांव करण्यांत आले होते त्याऐवजी महापौर वैद्यकीय सहाय्यता निधी असे नांव बॅंकेत दुरुस्त करण्यांबाबत कार्यवाही करावी.
- केडगांव वाढीव पाईपलाईन टाकणे या लेखाशिर्षात रक्कम रु.50 लाखाने तरतुद करण्यांत यावी.
- टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे या लेखाशिर्षात रक्कम रु. 50 लाखाने तरतुद वाढ करण्यांत यावी.
- शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 नळ कनेक्शन नविन लाईनवर स्थलांतरीत करणे या लेखाशिर्षात रक्कम रुपये 2 कोटींनी वाढ करण्यांत यावी.
- महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने व पर्यटनाच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या पिंपळगांव माळवी तलावात बोटींग सुरु करण्याबाबत प्रशासनाने योग्य ती उचित कार्यवाही करावी
- रस्ता फोडणे जोडणे वसुली व बांधकाम इतर या लेखाशिर्षात रक्कम रूपये 2 कोटीनी वाढ करण्यात यावी.
- महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने पिंपळगांव माळवी येथील जागेत फिल्म सिटी सारखा प्रकल्पाबाबत संबंधित विभागाने प्रस्ताव तयार करावा व मा.शासनाकडे यासाठी निधीच्या मागणीकरीता प्रस्ताव सादर करण्यांत यावा.
- चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या जागेत नविन इमारत व प्रोफेसर कॉलनी चौक येथील महानगरपालिकेच्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स महानगरपालिकेच्या माध्यमातुन बांधण्याबाबत प्रशासनाने योग्य तो प्रस्ताव तयार करुन कार्यालयीन सोपस्कार पार पाडावेत. सदर इमारतीचे बांधकाम झाल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील वाढ होईल.

- नविन रस्ते विकसीत करणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये 2 कोटी 5 लाखाने तरतुद वाढ करण्यात यावी.
- बेवारस प्रेतांची विल्हेवाट करणे व साथीच्या आजाराने मृत व्यक्तींचा बंदोबस्त करणे या लेखाशिर्षात 43 लाखांची तरतूद वाढ करण्यांत यावी.
- आरोग्य विभाग,कार्यालयीन खर्च ( बाह्ययंत्रणा ) नविन लेखाशिर्ष करुन 25 लाखांची तरतूद करण्यांत यावी.
- कोव्हीड मनपा निधीतून खर्च या लेखाशिर्षात 1 कोटींची तरतूद वाढ करण्यांत यावी.
- मागील आर्थिक वर्षातील नोंव्हेबर 2021 नंतर सुरू होणारा महानगरपालिका फंड निधीतील कामे करण्यास मंजूरी उशिराने झाली त्यामुळे विकास कामे त्यानंतर प्रस्तावित करण्यात आली. मागील आर्थिक वर्षातील बांधकाम विभागाकडील प्रस्तावित करण्यात आलेल्या विकास कामांना चालू आर्थिक वर्षात लेखाशिर्ष निहाय तरतूद करणे आवश्यक आहे. बांधकाम विभागाने वर्क ऑर्डर दिलेली व सुरु असलेल्या कामांची देयकांसाठी लेखाशिर्षनिहाय तरतुद करण्यांत येत आहे. 1) अतिरिक्त चटई निर्देशांक पोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे रक्कम रु.2 कोटी 50 लाख, 2) विकासभार निधीतून खर्च रक्कम रु.2 कोटी 63 लाख, 3) रेखांकन अंतर्गत सुधारणा(लेआऊट) 1 कोटी 42 लाख, 4) रेखांकन अंतर्गत सुधारणा ( बांधकाम ) 29 लाख, या लेखाशिर्षातील प्रस्तावित मंजूर विकास कामांसाठी वापरण्यात यावे. अशा कामांच्या निधीसह चालू आर्थिक वर्षात सदर लेखाशिर्षामध्ये तरतूद करण्यात यावी यास ही सभा मान्यता देत आहे. मागील सन 2021-2022 या आर्थिक वर्षातील प्रस्तावित विकास कामांचे प्रस्ताव प्राधान्याने घेण्यात यावे.
- अर्थ विभागाकडील सन 2021-2022 या आर्थिक वर्षात 31 मार्च 2022 पुर्वी खर्ची न पडलेले देयकांसाठी खालील लेखाशिर्षात देयके देण्यासाठी तरतुद करण्यांत यावी. 1) अतिरिक्त चटई निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कमेतुन कामे करणे रक्कम रु. 1 कोटी 25 लाख, 2) विकासभार निधीतून खर्च रक्कम रु. 20 लाख, 3) रेखांकन अंतर्गत सुधारणा ले आउट रक्कम रु.1 कोटी 20 लाख, 4) रस्ते खोदाई फी मधुन रस्ते करणे रक्कम रु. 1 कोटी इतकी तरतुद चालू आर्थिक वर्षात वाढ करण्यांत यावी.
- नगरसेवक मा.श्री.अनिल शिंदे यांनी दिलेल्या पत्रानुसार मागील आर्थिक वर्ष सन 2021-2022 मधील बांधकाम विभागाकडील वर्क ऑर्डर दिलेली व चालू असलेली कामांची देयके व अर्थ विभागाकडील मागील आर्थिक वर्षातील देयके चालू आर्थिक वर्षात देण्यासाठीची सन 2022-2023 चे तरतुदी मधुन वजा जाता उर्वरीत तरतुद चालू आर्थिक वर्ष सन 2022-2023 करिता वापरण्यांत यावी. सदरच्या लेखाशिर्ष निहाय तरतुदी खालील प्रमाणे करण्यांत यावी. सदर उत्पन्नात वाढ होणार असल्याने जमा व खर्च बाजुस तरतुद करण्यांत यावी.

1) अतिरिक्त चटई निर्देशांक पोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे रक्कम रु.15 कोटी 75 लाख,

2) विकासभार निधीतून खर्च रक्कम रु.6 कोटी 83लाख, विकासभार भुसंपादनासाठी रक्कम रु. 12 कोटी ,

3) रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआऊट ) रक्कम रु. 5 कोटी 62 लाख,

4) रेखांकन अंतर्गत सुधारणा ( बांधकाम ) रक्कम रु. 60 लाख,

5) रस्ते खोदाई फी मधुन रस्ते करणे रक्कम रु.3 कोटीने वाढ करण्यांत यावी.

अशी एकूण तरतूद करणे बाबत कार्यवाही करुन मागील आर्थिक वर्षातील तरतुदीमधुन मंजूर असलेली कामे प्रस्तावित करावीत व मागील वर्षातील अर्थविभागाकडील देयके देण्याबाबत कार्यवाही करावी व उर्वरीत तरतुद चालू आर्थिक वर्षासाठी वापरण्यांत यावी याबाबत अर्थ विभागाने कार्यवाही करावी.

- मा.उपमहापौर शहर विकास निधी या लेखाशिर्षकात 50 लाख रक्कम कमी करण्यांत यावी.
- मा.सभागृह नेता शहर विकास निधी 50 लाख तरतूद करण्यात यावी.
- मा.विरोधीपक्ष नेता शहर विकास निधी 15 लाख तरतूद करण्यात यावी.
- मा.सभापती महिला व बाल कल्याण समिती शहर विकास निधी 15 लाख तरतूद करण्यात यावी.
- मा.उपसभापती महिला व बाल कल्याण समिती शहर विकास निधी 10 लाख तरतूद करण्यात यावी.
- मा.स्थायी समितीने अंदाजपत्रकामध्ये विकास कामे लेखाशिर्षनिहाय प्रस्तावित केलेली आहेत. सदरची सर्व कामे रद्द करण्यात येत आहे. त्याप्रमाणे संबंधीत विभागाने नोंद घेवून कार्यवाही करावी.
- शहरातील मुख्य चौक सुशोभिकरण, शहरातील मुख्य रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था, कंपनी, सामाजिक संस्था, यांचे मार्फत करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. यास ही सभा मान्यता देत आहे. त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल.
- रसिक ग्रुप अहमदनगर व नगर जल्लोष ट्रस्ट, अहमदनगर यांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मागणी केल्यानुसार प्रत्येकी रक्कम रू. दीड लाख अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मागणी केलेल्या संस्थाचे धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत असले बाबत कागदपत्र, ताळेबंद व चार्टड अकौंट यांचेकडील हिशोब तपासणी आदी आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करूनच संस्थाना अर्थ सहाय्य देणे बाबत कार्यवाही करणेत यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.
- सभागृहात झालेल्या चर्चे नुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत महानगरपालिकेस निधी मंजूर करण्यात येतो. सन 2021-2022 व 2022-2023 साठी प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सोयी सुविधा विकास निधी, रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर/राज्यस्तर), आण्णाभाउ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर विकास निधी, नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत निधी, 15वा वित्त आयोग तसेच महानगरपालिका निधी व इतरही मा.शासनाच्या निधीतील कामे सुचित करण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे यास ही सभा मान्यता देत आहे.

- प्राथमिक सोयी सुविधा अनुदान या लेखाशिर्षामध्ये 9 लाखाने वाढ करण्यात यावी.
- पर्यावरणासाठी पायाभुत सुविधा पुरविणे अनुदान प्राप्त होणार असल्याने या लेखाशिर्षात जमा बाजुस रक्कम रु.2 कोटी 99 लाखाने वाढ करण्यांत यावी व खर्च बाजुस रक्कम रु.2 कोटी 99 लाख 99 हजार तरतुद वाढ करण्यांत यावी.

सन 2021-2022 या वर्षातील अंदाजपत्रकात खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक करणे, वाहन खरेदी, डिझेल खरेदी इत्यादी या लेखाशिर्षात रक्कम रु.10 लक्ष, महानगरपालिका रक्तपेढी औषधे व उपकरणे खरेदी या लेखाशिर्षात रक्कम रु. 6 लक्ष, कोंडवाडयावरील खर्च या लेखाशिर्षात रक्कम रु.20 लक्ष, बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा या लेखाशिर्षात रक्कम रु.10 लक्ष, शासकीय विमा या लेखाशिर्षात रक्कम रु.10 लाखाने वाढ करण्यांत यावी. व मराविमं विज बिल/पवन चक्की उभारणे या लेखाशिर्षात 56 लक्ष रुपयांनी तरतुद कमी करुन सुधारीत तरतुद करण्यांत यावी.

सन 2021-2022 चे सुधारित व सन 2022-2023 सालचे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी त्याबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेर फार यासह ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच अंदाजपत्रकाच्या 200 प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.अनिल माधवराव शिंदे
अनुमोदक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०९** **प्रस्ताव क्रमांक : ५७** **दिनांक:- २८/०३/२०२२**

-----------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

1) सौ.आशा शिवाजीराव कराळे माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

2) सौ.लताबाई बलभिम शेळके माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.

जा.क्र.नगरसचिव विभाग.AMC.-
दिनांक : २४/०३/२०२१.

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
मंगळवार दिनांक ३०/०३/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेमध्ये आपले नावासमोरील नगरसेवकांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबतचे मार्गदर्शन करणे बाबत...

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक ३०-०३-२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी खालील प्रमाणे आपल्या नावासमोर दर्शविलेल्या सन्माननीय सदस्यांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबत मार्गदर्शन करावे.

| अ.क्रं. | प्रभाग / जागा क्रमांक | सदस्यांचे नांव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १ | ११ - ब | घुले अविनाश हरिभाऊ<br>सभापती, स्थायी समिती | 9225322062 | श्री.विष्णु देशमुख |
| २ | ११ - ड | शेख नजीर अहमद अ.रज्जाक | 9272225862 | |
| ३ | १२ - अ | बाळासाहेब मारुती बोराटे | 9422222079 | |
| ४ | १२ - ड | कावरे दत्तात्रय हरीभाऊ | 9881777760 | |
| ५ | १३ - अ | कवडे उमेश (गणेश) खंडेराव | 9270443333 | |
| ६ | १३ - ड | लोंढे सुभाष सोपानराव | 9921799992 | |
| ७ | १४ - अ | भागानगरे प्रकाश बाबुराव | 9422230181 | |
| ८ | १४ - ड | भोसले गणेश पुंडलिक | 9422221596 | |
| ९ | १५ - अ | गायकवाड परसराम बाळू | 9860536395 | |
| १० | १५ - ड | शिंदे अनिल माधवराव | 9422223268 | |
| | | | | |
| ११ | ०४ – क | योगीराज शशिकांत गाडे | 9689896982 | श्री.किरण उजागरे |
| १२ | ०५ – अ | दुलम मनोज लक्ष्मण,<br>सभागृह नेता | 9225700007 | |

| अ.क्रं. | प्रभाग / जागा क्रमांक | सदस्यांचे नांव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १३ | ०५ – ड | गंधे (भैय्या) महेंद्र मोहनीराज | 9422220460 | |
| १४ | ०६ – ड | बारस्कर रविंद्र रावसाहेब | 9422221333 | |
| १५ | ०७ – ब | बडे अशोक किसन | 9822451468 | |
| १६ | ०७ – ड | वाकळे कुमार बबन | 9730015555 | |
| १७ | ०८ – क | शिंदे सचिन चंद्रशेखर | 9422229078 | |
| १८ | ०८ – ड | नळकांडे शाम किसन | 9271907171 | |
| १९ | ०९ – क | रिक्त | | |
| २० | १० – अ | उणावणे अक्षय सदानंद | 9130065007 | |
| | | | | |
| २१ | ०६ - ब | वाकळे सोन्याबापु बाबासाहेब, महापौर | 9422226510 | श्री.किशोर कानडे |
| २२ | १० - ड | शेख मुदस्सर जहांगीर | 8007863232 | |
| २३ | ०४ – ड | शिंदे स्वप्नील रोहिदास | 7774937777 | |
| २४ | ०१ – ड | बारस्कर संपत विजय, विरोधी पक्ष नेता | 9890408050 | |
| २५ | ०१ – अ | बोरुडे सागर अर्जुन | 9822115406 | |
| २६ | ०२ – अ | पाउलबुधे विनीत नाथ | 9822076968 | |
| २७ | ०२ – ड | त्र्यंबके सुनिल नारायण | 9552690159 | |
| २८ | ०३ – अ | आसिफ सुलतान | 9822828589 | |
| २९ | ०३ – ड | खान समद वहाब | 9860147715 | |
| | | | | |
| ३० | ०९ – ड | सुप्रिया धनंजय जाधव | 9860655555 | श्रीमती.हेमलता साळवे |
| ३१ | १० – ब | जाधव अश्विनी सचीन | 9850100009 | |
| ३२ | १० – क | पंजाबी अनिता जसपालसिंग | 9422236460 | |
| ३३ | ११ - अ | पारगे रुपाली जोसेफ | | |
| ३४ | ११ - क | कुरेशी परवीन आबीद | 9665025555 | |
| ३५ | १२ - ब | सुरेखा संभाजी कदम | 9422222003 | |
| ३६ | १२ - क | लोखंडे मंगल सुनिल | 9423561112 | |
| ३७ | १३ - ब | चितळे सोनाली अजय | 9881451331 | |
| ३८ | १४ - ब | जगताप शितल संग्राम | | |
| ३९ | १४ - क | चोपडा मीना संजय | 9822025757 | |
| | | | | |
| ४० | ०४ – ब | बोरकर शोभा सुधाकर | 9225522255 | श्रीमती.मेघना निकम |
| ४१ | ०५ – ब | शिंदे सोनाबाई तायगा | 7350333303 | |
| ४२ | ०५ – क | आशा शिवाजीराव कराळे | 9422221015 | |

| अ.क्रं. | प्रभाग / जागा क्रमांक | सदस्यांचे नांव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| ४३ | ०६ – अ | जाधव पल्लवी दत्तात्रय | 9604390180 | |
| ४४ | ०६ – क | ताठे वंदना विलास | 9527525888 | |
| ४५ | ०७ – अ | भाकरे रिता शैलेश | 9860755573 | |
| ४६ | ०७ – क | सप्रे कमल दत्तात्रय | 9822051375 | |
| ४७ | ०८ – अ | शेंडगे रोहिणी संजय | 9822788388 | |
| ४८ | ०८ – ब | बोरुडे पुष्पा अनिल | 9422227473 | |
| ४९ | ०९ – अ | चव्हाण शीला दीप | 9422221555 | |
| | | | | |
| ५० | ०९ - ब | ढोणे मालन सुरेश , उपमहापौर | 9923314224 | सौ.स्मिता जोशी |
| ५१ | १७ – क | शेळके लताबाई बलभिम<br>सभापती, महिला व बालकल्याण समिती | 9657979797 | |
| ५२ | १३ – क | गेनप्पा सुवर्णा संजय<br>उपसभापती, महिला व बालकल्याण समिती | 9420689999 | |
| ५३ | ०१ – ब | सौ.मीना शिवाजी चव्हाण | 8788206185 | |
| ५४ | ०१ – क | बारस्कर दिपाली नितीन | 9822415757<br>8087099198 | |
| ५५ | ०२ – ब | वारे रुपाली निखील | 9850000852 | |
| ५६ | ०२ – क | पवार संध्या बाळासाहेब | 9561252700<br>8888757636 | |
| ५७ | ०३ – ब | खान मिनाज जाफर | 9021112312 | |
| ५८ | ०३ – क | शेख रिजवाना फारुक | 9881870245 | |
| ५९ | ०४ – अ | सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डिले) | 8975872525 | |
| | | | | |
| ६० | १५ - ब | जाधव सुवर्णा दत्ता | 9271881256<br>9404615151 | श्री.उपलंची |
| ६१ | १५ - क | खैरे विद्या दिपक | 9881742471 | |
| ६२ | १६ - अ | शिंदे शांताबाई दामोदर | 9890537625 | |
| ६३ | १६ - ब | कोतकर सुनिता संजय | 8888026575 | |
| ६४ | १६ - क | पठारे विजय मोहनराव | 9623240303 | |
| ६५ | १६ - ड | येवले ज्ञानेश्वर उर्फ अमोल शिवाजी | 9881778181 | |
| ६६ | १७ - अ | कांबळे राहुल दादु | 9922708803 | |
| ६७ | १७ - ब | ननावरे गौरी गणेश | 9422319181 | |
| ६८ | १७ - ड | कोतकर मनोज शंकर | 9890449126 | |

| अ.क्रं. | प्रभाग / जागा क्रमांक | सदस्यांचे नांव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| ६९ | स्विकृत सदस्य | आढाव मदन संपत | ९२७२८१७१११ | श्री.सोनु चौधरी ९१७५८९४७३१ |
| ७० | स्विकृत सदस्य | शेळके संग्राम बबनराव | ९६८४११११११ | |
| ७१ | स्विकृत सदस्य | आंधळे रामदास नानाभाऊ | ९८२३०३६१६१ | |
| ७२ | स्विकृत सदस्य | शेटीया विपुल मुलचंद | ९८२२०६९८११ | |
| ७३ | स्विकृत सदस्य | कातोरे राजु आसाराम | ९८९०९०२२९१ | |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव.-
दिनांक : २१ / ०३ /२०२२

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक २८-०३-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त (सा),

अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४) | श्रीमती.निकम, नगरसचिव कार्यालय | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ५) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे.

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०९, सोमवार दि. २८/०३/२०२२ रोजीचा अर्थसंकल्पीय सर्वसाधारण होणा-या सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

---*---

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.बाळासाहेब भोर | |
| २ | श्री.उन्मेश क्षिरसागर | |
| ३ | श्री.झिने | |
| ४ | श्री.बाबासाहेब कोतकर | |

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव.-
दिनांक : .

१) श्री.काटकर, सा.प्र.वि.विभाग
२) श्री.सुभाष ढगे, विरोधी पक्ष नेता कार्यालय,
३) श्री. शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
४) श्री.राजु दळवी,आयुक्त कार्यालय
५) श्री.आकाश घुले, सभागृह नेता कार्यालय,

६) श्री.बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय
७) श्री.प्रदिप निलाखे, म.बा.क.समिती कार्यालय
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक २८-०३-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : ११/०४/२०२२.

विषय : मंगळवार दिनांक - २९ / ०३ /२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०९ चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या

बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २८/०३/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे. सदर सभेमध्ये मा.सभापती, स्थायी समितीने, मा.महापौर साहेब यांचेकडेस सादर केला व सदरहु अर्थसंकल्पीय सभा दिनांक २९/०३/२०२२ रोजी घेण्यांत आली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.१५,०५०/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार पन्नास फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या* **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | **:** | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | **:** | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | **:** | |
| **२ व ३ ची बेरीज** | **:** | |
| **उपलब्ध शिल्लक** | **:** | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
मा.जिल्हा सरकारी वकील,
जिल्हा न्यायालय,
अहमदनगर.

विषय :- मा.दिवाणी न्यायालय, अहमदनगर येथील दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.९६/२०२१
श्री.श्रीपाद छिंदम विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ :- १) अमपा-२०१८/प्र.क्र.१०४/नवि-२५ दिनांक २२/०३/२०२१ मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र.

२) कोर्ट विभाग जा.क्र. १९६ दिनांक २४/०३/२०२१.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यांत येते की, विषयांकित अर्जामध्ये शासनाच्या वतीने मा.दिवाणी न्यायालय, अहमदनगर येथे जबाब दाखल करण्यासाठी मला प्राधिकृत करण्यांत आले आहे.

तरी विषयांकित प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने सरकारी वकील यांची नियुक्ती करुन कामकाज पाहण्याचे करावे हि विनंती.

सोबत :- वकील पत्र.

आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२) वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये व दिनांक ०९ सप्टेंबर २०२० च्या पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.